अनुक्रमणिका

1. श्री संकष्टनाशनं गणपती स्तोत्र
2. श्री गणपतीस्तोत्र
3. श्री दुर्गा स्तोत्र
4. श्री ज्योतिर्लिंगाष्टक
5. श्री शिव स्तुती
6. श्री अनंत स्तुती
7. श्री नृसिंह स्तोत्र
8. श्री नृसिंह नमस्कार पंचक
9. श्री लक्ष्मीनृसिंह प्रार्थना
10. श्री मारुती स्तोत्र
11. श्री करुणात्रिपदी
12. श्री स्वामी समर्थ तारक मंत्र
13. दासबोध - नामस्मरणभक्ति
14. सद्गुरु सुबोध - श्री गोंदवलेकर महाराज
15. साखळीचे अभंग - संत तुकाराम महाराज
16. साधनाष्टक - स्वरूपानंद स्वामी
17. ज्ञानेश्वरी - गणपती स्तवन
18. एकनाथी भागवत - गणपती स्तवन
19. दासबोध – गणेशस्तवन
20. दासबोध – शारदास्तवन
21. दासबोध – सद्गुरुस्तवन
22. दासबोध – संतस्तवन
23. मनाचे श्लोक

| श्री संकष्टनाशनं गणपती स्तोत्र |

साष्टांग नमन हे माझे गौरीपुत्रा विनायका
भक्तीने स्मरता नित्य आयुकामार्थ साधती
प्रथम नाव वक्रतुंड, दुसरे एकदंत ते,
तिसरे कृष्णपिंगाक्ष, चवथे गजवक्र ते,
पाचवे श्री लंबोदर, सहावे विकट नाव ते,
सातवे विघ्नराजेंद्र, आठवे धुम्रवर्ण ते,
नववे श्री भालचंद्र, दहावे श्री विनायक,
अकरावे गणपती, बारावे श्री गजानन,
देव नावे अशी बारा तीन संध्या म्हणे नर,
विघ्नभिती नसे त्याला प्रभो तु सर्व सिध्दीत,
विद्यार्थाला मिळे विद्या , धन्यार्थ्याला मिळे धन,
पुत्रार्थ्याला मिळे पुत्र, मोक्षार्थ्याला मिळे गती,
जपता गणपती स्तोत्र सहा मासात हे फळ,
एक वर्ष पुर्ण होता मिळे सिध्दी न संशय,
नारदांनी रचिलेले झाले संपुर्ण स्तोत्र हे,
श्रीधराने मराठित पठण्या अनुवादिले.

| श्री गणपतीस्तोत्र |

जयजयाजी गणपती, मज द्यावी विपुल मती ।
करावया तुमची स्तुती, स्फूर्ती द्यावी मज अपार |
तुझे नाम मंगलमूर्ती, तुज इंद्रचंद्र ध्याती ।
विष्णु शंकर तुज पुजिती, अव्यया ध्याती नित्यकाळी |
तुझे नाम विनायक, गजवदना तू मंगलदायक ।
सकल विघ्ने कलिमलदाहक, नामस्मरणे भस्म होती |
मी तव चरणांचा अंकीत, तव चरणामाजी प्रणिपात ।
देवाधीदेवा तू एकदंत, परिसे विज्ञापना एक माझी |
माझा लडीवाळ तुज करणे, सर्वांपरी तू मज सांभाळणे ।
संकटामाजी रक्षिणे, सर्व करणे तुज स्वामी |
गौरिपुत्रा तू गणपती, परिसावी सेवकांची विनंती ।
मी तुमचा चरणार्थी, रक्षिणे सर्वार्थेची स्वामिया |
तूच माझा माय बाप, तूच माझा देवराय ।
तूच माझी करिशी सोय, अनाथनाथ गणापती |
गजवदना श्री लंबोदरा, सिध्दीविनायका भालचंद्रा
हेरंबा शिवपुत्रा, विश्वेश्वरा अनाथबंधू |
भक्तपालका करी करुणा, वरदमूर्ती गजानना ।
परशुहस्ता सिंदुरवर्णा, विघ्ननाशका विश्वमूर्ती |

विश्ववदना विघ्नेश्वरा, मंगलाधीशा परशुधरा ।
पापमोचना सर्वेश्वरा, दीनबंधु नमन माझे |
नमन माझे विघ्नहर्ता, नमन माझे एकदंता ।
नमन माझे गिरिजासुता, तुज स्वामिया नमन माझे |
नाही आशा स्तुतिची, नाही आशा तव भक्तिची ।
सर्व प्रकारे तुझिया दर्शनाची, आशा मनी उपजली |
मी केवळ मूढ अज्ञान, ध्यानी तुझे सदा चरण ।
लंबोदरा मज देई दर्शन, कृपा करी जगदीशा |
मतीमंद मी बालक, तूची सर्वांचा चालक ।
भक्तजनांचा पालक, गजमुखा तू होसी |
मी दरिद्री अभागी स्वामी, चित्त जडावे तुझिया नामी ।
अनन्यशरण तुजला मी, दर्शन देई कृपाळुवा |
हे गणपतीस्त्रोत्र जो करी पठण, त्यासी स्वामी देई अपार धन ।
विद्यासिध्दीचे अगाध ज्ञान, सिंदुरवदन देईल पै |
त्यासी पिशाच्च भूत प्रेत, न बाधिती कदाकाळात ।
स्वामिची पुजा करोनी यथास्तित, स्तुतिस्त्रोत्र हे जपावे |
होईल सिध्दी षण्मास हे जपता, नव्हे कदा असत्य वार्ता ।
गणपतीचरणी माथा, दिवाकरे ठेविला |
इती श्रीगणपतीस्तोत्रं संपूर्णम् ।
श्री गजाननार्पणमस्तु ।

| श्री दुर्गा स्तोत्र |

| श्री गणेशाय नमः |

नगरात प्रवेशले पंडुनंदन | तो देखिले दुर्गास्थान | धर्मराज करी स्तवन | जगदंबेचे तेधवा |१|
जय जय दुर्गे भुवनेश्वरी | यशोदागर्भसंभवकुमारी | इन्दिरारमणसहोदरी | नारायणी चंडीके अंबीके |२|
जय जगदंबे विश्वकुटुंबिनी | मूलस्फुर्ति प्रणवरुपिणी | ब्रह्मानंदपददायिनी | चिद्विलासिनी जगदंबे |३|
जय जय धराधरकुमारी | सौभाग्यगंगे त्रिपुरसुंदरी | हेरंबजननी अंतरी | प्रवेशी तू अमुचे |४|
भक्तहृदयारविंद भ्रमरी | तुझिया कृपावलोकने निर्धारी | अतिमूढ तो निगमार्थ करी | काव्यरचना करी अद्भुत |५|
तुझिया कृपावलोकने करून् | जन्मांधासी येती नयन् | पांगुळ करी गमन | दूर पंथी त्वरेने |६|
जन्माधारभ्य जो मुका | होय वाचस्पतीसमान बोलका | तू स्वानंदसरोवरमराळिका | होसी भाविका सुप्रसन्न |७|
ब्रम्हानंदे आदि जननी | तव कृपेची नौका करुनी | दुस्तर भवसिंधु उल्लंघोनी | निवृत्ती तटा नेईजे |८|
जय जय आदि कुमारीके | जय जय मूळपीठनायिके | सकल सौभाग्यदायिके | जगदंबिके विश्व प्रकृतिके |९|
जय जय भार्गवप्रिये भवानी | भवनाशके भक्तवरदायिनी | समुद्रकारके हिमनगनंदिनी | त्रिपुरसुंदरी महामाये |१०|
जय आनंदकासारमराळिके | पद्मनयने दुरितवनपावके | त्रिविध ताप भवमोचके | सर्व व्यापके मृडानी |११|
शिवमानस कनकलतिके | जय चातुर्य चंपककलिके | शुंभ निशुंभ दैत्यांतके | निजजनपालके अपर्णे |१२|
तव मुखकमल शोभा देखोनी | इंदुबिंब गेले विरोनी | ब्रम्हादिदेव बाळे तान्ही | स्वानंदसदनी नीजवीसी |१३|
जीव शिव दोन्ही बालके | अंबे तुवा निर्मिली कौतुके | स्वरुप तुझे जीव नोळखे | म्हणोनी पडला आवर्ती |१४|
शिव तुझे स्मरणी सावचित्त | म्हणोनी तो नित्यमुक्त | स्वानंदपद हाता येत् | तुझे कृपेने जननीये |१५|
मेळवुनी पंचभूतांचा मेळ् | तुवा रचिला ब्रह्माडगोळ | इच्छा परतता तत्काळ | क्षणे निर्मूळ करीसी तू |१६|
अनंत बालादित्य श्रेणी | तव प्रभेमाजी गेल्या विरोनी | सकल सौभाग्य शुभकल्याणी | रमारमण वरप्रदे |१७|
जय शंबरारि रिपुवल्लभे | त्रैलोक्यनगरारंभस्तंभे | आदिमाये आत्मप्रिये | सकळारंभे मूळप्रकृती |१८|
जय जय करुणामृतसरिते । भक्तपालके गुणभरिते | अनंत ब्रह्मांड फलाकिंते | आदिमाये अन्नपुर्णे |१९|
तु सच्चिदानंद प्रणवरुपिणी | सकलचराचर व्यापिणी | सर्गस्थित्यंतकारिणी | भवमोचनी ब्रह्मानंदे |२०|
ऐकोनी धर्मराजाचे स्तवन् | दुर्गा झाली प्रसन्न | म्हणे तुमचे शत्रू संहारीन ।राज्यी स्थापीन धर्मांते ||२१|
तुम्ही वास करावा येथे | प्रकटो नेदी जनाते | शत्रू क्षय पावती समस्त | सुख अद्भुत तुम्हा होय |२२|
तुवा जे केले स्तोत्रपठण् | ते जे त्रिवार करती पठण | त्यांचे सर्व कामा पुरवीन । सदा रक्षीन् अंतर्बाह्य |२३|
इति श्री युधिष्ठिर विरचितं श्री दुर्गा स्तोत्रम संपूर्ण |२४ |

| श्रीज्योतिर्लिंगाष्टक |

श्रीगणेशाय नमः |

पायी तुझ्या मस्तक हे असावे | नयनी सदा रूप तुझे वसावे |

तुझे चरित्र श्रवणी श्रवणासि द्यावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |१|

वाणीस हे अतुल नाम तुझे घडोदे | ध्यानी तुझ्या मन सदैव बरे जडोदे |

पाणीस पूजन तुझे विधियुक्त द्यावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |२|

हे चित्त निश्चळ तुझे भजनी वळावे | दुर्गुण दु:संगति नातळावे |

क्रोधादि काम रिपु हे समुळी गळावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |३|

पायी अमंगळ पथापथि न आक्रमावे | यात्रा शिवालय कथा पथ आक्रमावे ।

अज्ञान मोह कुमती सखया हरावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |४|

वाचेसहीत मन देह वळोनि मागे | भक्तीसि लावि आपुल्या दृढ हेचि मागे |

बाह्यांतरी अचल रूप तुझे भरावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |५|

ब्रह्मस्व मुक्त करणे तुज भार पायी | घालू नको मज दीना भलत्या अपायी |

आहे पतीत सखया दीना उद्धरावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |६|

परमार्थ साधुनि प्रपंच बरा असावा | दारिद्र्य दु:ख भय लेश कदा नसावा |

स्त्रीपुत्रयुक्त मजला सुख हे असावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |७|

पायी ब्रिदावळि विराजित पावना की | धावे भक्ताचे संकट हरावया की |

राखे ब्रिदास भवसंकट हे हरावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |८|

श्रीनाथजी शिवजगद्गुरु ज्योतिर्लिंगा | दे जन्म ज्यासि तव भक्ति तथा कुळीगा |

गोविंदनंदन सुतांतर की न द्यावे | श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे |९|

।। श्री शिव स्तुती ।।

कैलासराणा शिव चंद्रमौळी फणींद्र माथा मुगुटी झळाळी!
कारुण्यसिंधू भवदु:खहारी! तुजवीण शंभो मज कोण तारी |१|

रवींदुदावानला पूर्ण भाळी स्वतेज नेत्री तिमिरौघ जाळी|
ब्रह्मांडधीशा मदनांतकारी| तुजवीण शंभो मज कोण तारी |२|

जटा विभूती उटि चंदनाची कपालमाला प्रित गौतमीची
पंचानना विश्वनिवांतकारी तुजवीण शंभो मज कोण तारी |३|

वैराग्ययोगी शिव शूलपाणी सदा समाधी निजबोध वाणी
उमानिवासा त्रिपुरांतकारी तुजवीण शंभो मज कोण तारी |४|

उदारमेरू पति शैलजेचा श्रीविश्वनाथ म्हणती सुरांचा
दयानिधी तो गजचर्मधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |५|

ब्रह्मादि बंदी अमरादिनाथ भुजंगमाला धरि सोमकान्त
गंगा शिरी दोष महा विदारी तुजवीण शंभो मज कोण तारी |६|

कर्पूरगौरी गिरिजा विराजे हलाहळ कंठ निळाच साजे
दारिद्र्यदु:खे स्मरणे निवारी तुजवीण शंभो मज कोण तारी |७|

स्मशानक्रीडा करिता सुखावे तो देवचुडामणि कोण आहे
उदासमूर्ति जटाभस्मधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |८|

भूतादिनाथ अरि अंतकाचा तो स्वामी माझा ध्वज शांभवाचा
राजा महेश बहुबाहुधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |९|

नंदी हराचा हर नंदिकेश श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश
सदाशिव व्यापक तापहारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१०|

भयानक भीम विक्राळ नग्न लीलाविनोदे करि काम भग्न
तो रुद्र विश्वंभर दक्ष भारी तुजवीण शंभो मज कोण तारी |११|

इच्छा हराची जग हे विशाळ पाळी रची तो हरि ब्रह्मगोळ
उमापती भैरव विघ्नहारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१२|

भागिरथीतीर सदा पवित्र जेथे असे तारक ब्रह्ममंत्र
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१३|

प्रयाग वेणी सकळा हराच्या पदारविंदी वहाती हरीच्या
मंदाकिनी मंगल मोक्षकारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१४|

किर्ती हराची स्तुति बोलवेना कैवल्यदाता मनुजा कळेना
एकाग्रनाथ विष अंगिकारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१५|

सर्वांतरी व्यापक जो नियंता तो प्राणलिंगाजवळी महंता
अंकी उमा ते गिरिरुपधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१६|

सदा तपस्वी असे कामधेनू सदा सतेज शतकोटि भानू
गौरीपती जो सदा भस्मधारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१७|

कर्पूरगौर स्मरल्या विसावा चिंता हरी जो भजका सदैवा
अंती स्वहीतसुचना विचारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१८|

विरामकाळी विकळे शरीर उदास चित्ती न धरीच धीर
चिंतामणी चिंतनी चित्तहारी तुजवीण शंभो मज कोण तारी |१९|

सुखावसानी सकळे सुखाची दु:खावसानी टळती जगाची
देहावसानी धरणी थरारी तुजवीण शंभो मज कोण तारी |२०|

अनुहतशब्द गगनी न माय तिचे निनादे भव शून्य होय
कथा निजांगे करुणा कुमारी तुजवीण शंभो मज कोण तारी |२१|

शांतिस्वलीला वदनी विकासे ब्रह्मांडगोळी असुनी न दीसे
भिल्ली भवानी शिव ब्रह्मचारी तुजवीण शंभो मज कोण तारी |२२|

पीतांबरे मंडित नाभि त्याची शोभा जडीत वरि किंकिणींची
श्रीवेददत्त दुरितांतकारि तुजवीण शंभो मज कोण तारी |२३|

जीवाशिवाची जडली समाधी विटला प्रपंची तुटली उपाधी
शुद्धस्वरे गर्जति वेद चारी तुजवीण शंभो मज कोण तारी |२४|

निधानकुंभ भरला अभंग पहा निजांगें शिव ज्योतिलिंग
गंभीर धीर सुरचक्रधारी तुजवीण शंभो मज कोण तारी | २५|

मंदार बिल्वें बकुलें सुवासी माला पवित्र वहा शंकरासी
काशीपुरीं भैरव विश्व तारी तुजवीण शंभो मज कोण तारी | २६|

जाई जुई चंपक पुष्पजाती शोभे गळां मालतीमाळ हातीं
प्रतापसूर्य शरचापधारी तुजवीण शंभो मज कोण तारी | २७|

अलक्ष्यमुद्रा श्रवणीं प्रकाशे संपूर्ण शोभा वदनीं विकासे
नेई सुपंथें भवपैलतीरीं तुजवीण शंभो मज कोण तारी | २८|

नागेशनामा सकळां जिव्हाळा मना जपें रे शिवमंत्रमाळा
पंचाक्षरी ध्यान गुहाविहारी तुजवीण शंभो मज कोण तारी | २९|

एकांति ये रे गुरुराज स्वामी चैतन्यरूपीं शिव सौख्यनामीं
शिणलों दयाळा बहुसाल भारी तुजवीण शंभो मज कोण तारी | ३०|

शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थांसि जाऊं नको
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको
काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको |

| कौंडिण्य ऋषीनी केलेली श्री अनंत स्तुती |

नमो नमस्ते गोविंदा | श्रीवत्सला चिदानंदा । तुझे स्मरणमात्रें दुःखमदा । हरोनि जातीं सर्व पापें |
तूं वरेण्य यज्ञपुरुष ब्रह्मा-विष्णु-महेश । तुझे दर्शनमात्रें समस्त दोष । हरोनि जाती तात्काळीं |
नमो नमस्ते वैकुंठवासी । नारायणा लक्ष्मीविलासी । जगदैव्यापी प्रतिपाळिसी । अनंतकोटि ब्रह्मांडनायका |
पापी आपण पापकर्मी । नेणों तुझी भक्तिधर्मी । पापात्मा पापसंभव आम्ही । क्षमा करीं गा दातारा |
तुजवांचोनि आपण । अन्यथा दैवत नेणें । याचि कारणें धरिले चरण । शरणागत मी तुझा |
आज माझा जन्म सफळ । धन्य माझें जीवन केवळ । तुझें देखिलें चरणकमळ भ्रमर होवोनि वास घेतों |
ऐसें स्तविलें कौंडिण्यांनीं । ऐकोनि प्रसन्न झाला तत्क्षणीं । भक्तजना चिंतामणि ।
वरत्रय देता झाला | धर्मप्राप्ति दरिद्रनाशन शाश्वत वैकुंठभुवन । ऐसा वर दिधला नारायणे |

श्री नृसिंह स्तोत्र

कडकडकड स्तंभी स्फोट विस्फोट मोठा | गुरगुरगुर व्यापी व्योम पाठी धपाटा |
दणदणदण नादे भूमी ती कापता हे |धगधगधग ज्वाळे नेत्र विस्फारता हे
सळसळसळ स्कंधी कुंतले रुळता हे |अकटविकट मुखे सिंह तो गर्जता हे |
लखलखलख नेत्री तेज ते फाकता हे | लळलळलळ जिव्हा भक्ष्य ते शोधता हे |
झडकरि उचलोनी दैत्य तो घेतलासे | धड न घर न मार्गे उंबऱ्यामाजी बैसे |
करकरकर दाती काळ सन्निध भासे | खरखर नख तीक्ष्णे दैत्य तो फाडिलासे |
रुधिर गळत देही भीषणे दृष्य सारे | थरथरथर कापे लोकसृष्टी थरारे |
फडफडफड प्राणे सोडिले दैत्यराजे |
रिपुदमन करोनी सज्जना सोडविजे | शिर नमवुनी पायी भक्त प्रल्हाद भावे |
अतिशरणत होता उग्रही शांतवावे | सदयहृदय स्वामी रौद्र हे आवरावे |
नमवित शिर पायी विनवितो भक्तीप्रेमे | खडतर रिपु साही अंतरी मातलेले |
वधुनि सकळ त्याते शुद्ध चित्ता करावे | भजन सहजभावे अंतरी होत जावे |
सकल मति स्वभावे त्वत्स्वरुपी भरावे | सदगुण तरी काही अंतरी ते स्थिरावे |
हृदयी पद प्रभूचे सार्थ ते होत जावे |
| श्री लक्ष्मी नृसिंह चरणार्पणमस्तु |

| नमस्कार पंचक |
सदा सर्वदा प्रार्थना श्रीहरितें । घडो भक्ती, सेवा तुझी बा आम्हाते ।
तुझ्या कारणे देह माझा झिजावा । नमस्कार साष्टाग लक्ष्मी-नृसिहा | १ |
तुझी धीर, गंभीर मूर्ती बघाया । मना लागलीसे तृषा देवराया |
परी पूजनाचे नसें ज्ञान आम्हां । नमस्कार साष्टांग लक्ष्मी-नृसिंहा | २ |
प्रभो राहिला विश्व व्यापूनि सारें । तुला वर्णिता वेद झाले मुके रे ।
तुला पामरे मी कसा आळवावा । नमस्कार साष्टांग लक्ष्मी- नृसिंहा ।। ३ ।।
दया येउ दे आमुची मायबापा । करी रे हरी दूर संसारतापा ।
अहर्नीश लागो तुझा ध्यास आम्हां । नमस्कार साष्टांग लक्ष्मी-नृसिंहा ।। ४ ।।
दया सागरा, दीननाथा उदारा। मला ज्ञान देऊनि, अज्ञान वारा ।।
कृपेचा तुझ्या नित्य मेवा मिळावा । नमस्कार साष्टांग लक्ष्मी-नृसिंहा ।। ५ ।।

।। श्री लक्ष्मीनृसिंह प्रार्थना ।।

महादैत्य झाला मदोन्मत्त भारी । छळाने प्रजा त्रस्त झाली सारी ।

तदा प्रगटला देव स्तंभातूनी हा । नमस्कार माझा श्री लक्ष्मी नृसिंहा | १ |

नराचा देह शिर केसरीचे । असे रुप ज्याचे दिसे दिव्य साचे ।

प्रत्यक्ष विष्णू कमलापती हा । नमस्कार माझा श्री लक्ष्मी नृसिंहा | २ |

तव नखांनी विदारी सुरांच्या रिपूला । परी भक्त प्रल्हाद तो रक्षियेला ।

अवतार लीला तुझी ही अहाहा । नमस्कार माझा श्री लक्ष्मी नृसिंहा | ३ |

तुझिया दर्शनाची मना आस मोठी । तुझे नांव खेळे अखंडीत ओठी ।

पापे सहस्त्रावधी सान मोठी । अपराध ही ते तू घाल पोटी |४|

संसार कातर बहू घोर वाटे । आनंद दुःख किती क्लेश काटे ।

दया येऊ दे रे कसे दुःख साहू | किती हाक मारु किती वाट पाहू | ५|

लक्ष्मीपते हे नरहरी स्वरुपा । कृपा नित्य देती प्रभू मायबापा ।

तुझीया वाचूनी अन्य कोणी न त्राता । क्षणी या क्षणी धाव रे धाव आता | ६|

| श्री मारुती स्तोत्र |

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती | वनारी अंजनीसुता, रामदुता प्रभंजना |१|
महाबळी प्राणदाता, सकळा उठवी बळे | सौख्यकारी दु:खहारी, धूर्त वैष्णव गायका | २|
दीननाथा हरीरुपा, सुंदरा जगदंतरा | पातालदेवता हंता, भव्य सिंदुर लेपना | ३|
लोकनाथा, जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना | पुण्यवंता, पुण्यशिला, पावना परितोषका | ४|
ध्वजांगे उचली बाहो, आवेशे लोटला पुढे | काळाग्नी काळरुद्राग्नी, देखता कांपती भये | ५|
ब्रम्हांडे माईली नेणों आंवाळे दंतपंक्ती | नेत्राग्नी चालील्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळे | ६|
पुच्छ ते मुर्डीले माथा, किरीटी कुंडले बरी | सुवर्ण कटी कांसोटी , घंटा किंकिणी नागरा | ७|
ठकारे पर्वता ऐसा, नेटका सडपात़ळु | चपळांग पाहता मोठे, महाविद्युल्लतेपरी | ८|
कोटीच्या कोटी उड्डाणे, झेपावे उत्तरेकडे | मंद्रादीसारखा द्रोणु क्रोधे उत्पाटिला बळे | ९|
आणिला मागुती नेला, आला गेला मनोगती | मनासी टाकीले मागे, गतिसी तुळणा नसे | १०|
अणुपासोनि ब्रम्हांडाएवढा होत जातसे, तयासी तुळणा कोठे, मेरुमंदार धाकुटे | ११|
ब्रम्हांडाभोवते वेढे, वज्रपुच्छे करु शके | तयासी तुळणा कैंची, ब्रम्हांडी पाहता नसे | १२|
आरक्त देखिले डोळा, ग्रासिले सूर्यमंडळा | वाढता वाढता वाढे, भेदिले शून्यमंडळा | १३|
धनधान्य पशुवृद्धी, पुत्रपौत्रसमस्तही | पावती रुपविद्यादी स्तोत्रपाठेकरुनिया | १४|
भूतप्रेतसमंधादि रोगव्याधी समस्तही | नासती तुटती चिंता आनंदे भीमदर्शने | १५|
हे धरा पंधराश्लोकी लाभली शोभली बरी | दृढदेहो, निसंदेहो, संख्याचंद्रकळागुणे | १६|
रामदासी अग्रगण्यु, कपीकुळासी मंडणु | रामरुपी अंतरात्मा, दर्शने दोष नासती | १७|
| इती श्रीरामदासकृतं संकटनिरसनं मारुतीस्तोत्रं सम्पूर्णं |

।। श्रीकरुणात्रिपदी ।।

शांत हो श्रीगुरुदत्ता। मम चित्ता शमवी आतां।।ध्रु०।।
तूं केवळ माता जनिता। सर्वथा तूं हितकर्ता।।
तूं आप्त स्वजन भ्राता। सर्वथा तूचि त्राता।।
भयकर्ता तूं भयहर्ता। दंडधर्ता तूं परिपाता। तुजवाचुनि न दुजी वार्ता।
तूं आर्ता आश्रय दत्ता।। शांत हो श्रीगुरुदत्ता.. ।।१।।
अपराधास्तव गुरुनाथा। जरि दंडा धरिसी यथार्था।।
तरि आम्ही गाउनि गाथा। तव चरणीं नमवूं माथा।।
तूं तथापि दंडिसी देवा। कोणाचा मग करूं धावा? सोडविता दुसरा तेव्हां।
कोण दत्ता आम्हां त्राता? शांत हो श्रीगुरुदत्ता.. ।।२।।
तूं नटसा होउनि कोपी। दंडितांहि आम्ही पापी।
पुनरपिही चुकत तथापि। आम्हांवरि नच संतापी।।
गच्छतः स्खलनं क्वापि। असें मानुनि नच हो कोपी। निजकृपालेशा ओपी।
आम्हांवरि तूं भगवंता।। शांत हो श्रीगुरुदत्ता.. ।।३।।
तव पदरीं असता ताता। आडमार्गीं पाऊल पडतां।
सांभाळुनि मार्गावरता। आणिता न दूजा त्राता।
निजबिरुदा आणुनि चित्ता। तूं पतीतपावन दत्ता। वळे आतां आम्हांवरता।
करुणाघन तूं गुरुनाथा।। शांत हो श्रीगुरुदत्ता.. ।।४।।
सहकुटुंब सहपरिवार। दास आम्ही हें घरदार।
तव पदी अर्पुं असार। संसाराहित हा भार।
परिहरिसी करुणासिंधो। तूं दीनानाथ सुबंधो। आम्हां अघलेश न बाधो।
वासुदेव प्रार्थित दत्ता।। शांत हो श्रीगुरुदत्ता। मम चित्ता शमवी आतां।।५।।
2
श्रीगुरुदत्ता जय भगवंता। तें मन निष्ठुर न करी आता।।ध्रु०।।
चोरें द्विजासी मारीतां मन जें। कळवळलें तें कळवळो आतां।। श्रीगुरुदत्ता।।१।।
पोटशूळानें द्विज तडफडतां। कळवळलें तें कळवळो आतां।। श्रीगुरुदत्ता।।२।।
द्विजसुत मरता वळलें तें मन। हो कीं उदासीन न वळे आतां।। श्रीगुरुदत्ता।।३।।
सतिपति मरता काकुळती येतां। वळलें तें मन न वळे कीं आतां।। श्रीगुरुदत्ता।।४।।
श्रीगुरुदत्ता त्यजि निष्ठुरता। कोमल चित्ता वळवी आतां।। श्रीगुरुदत्ता।।५।।

।। प्रदक्षिणा ।।

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सदगुरु रायाची,
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची |
पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी
सर्वही तीर्थही घडली आम्हा आदिकरुनी काशी |
मृदंग-टाळ-ढोल-भक्त भावार्थ गाती
नामसंकीर्तने ब्रम्हानंदे नाचती |
कोटी ब्रम्हहत्या हरती करिता दंडवत
लोटांगण घालिता मोक्ष लोळे पायात |

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा-निगमांसी
अनुभव ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवासी |
प्रदक्षिणा करुनी देह भावे वाहिला
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला |

| श्री स्वामी समर्थ तारक मंत्र |

नि:शंक हो निर्भय हो मना रे,
प्रचंड स्वामीबळ पाठीशी रे,
अतर्क्य अवधुत हे स्मरणगामी,
अशक्य ही शक्य करतील स्वामी,
जिथे स्वामीपाय तिथे न्युन काय,
स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय.
आज्ञेविन काळ ना नेई त्याला
परलोकीही ना भिती तयाला,
उगाची भितोसी भय हे पळु दे.
जवळी उभी स्वामी शक्ती कळु दे,
जगी जन्ममृत्यु असे खेळ ज्यांचा,
नको घाबरु तु असे बाळ त्यांचा.
खरा होई जागा श्रद्धेसहीत,
कसा होशी त्याविण तु स्वामीभक्त.
कितीदा दिला बोल त्यांनीच हात,
नको डगमगु स्वामी देतील साथ,
विभुती नमन नाम ध्यानादी तीर्थ
स्वामीच ह्या पंचप्राणामृतात,
हे तीर्थ घे आठवी रे प्रचिती,
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती.
श्री स्वामी चरणविंदार्पणमस्तु |

---

(१)

अलंकापुरी पुण्यभुमी पवित्र,
तिथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र,
जया आठविता घडे पुण्यराशी,
नमस्कार माझा श्रीज्ञानेश्वरासी |
(२)
शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे,
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे.
कवि वाल्मिकीसारिखा थोर ऐसा,
नमस्कार माझा तया श्रीरामदासा |
(३)
अनुदीन अनुतापें तापलो रामराया,
परमदीन दयाळा नीरसी मोहमाया
अचपळ मन माझे नावरे आवरीता
तुजविण शीण होतो धावरे धाव आता.
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला
स्वजन जनधनाचा व्यर्थ म्या स्वार्थ केला
रघुपती मती माझी आपुलीशी करावी
सकळ त्यजुनी भावें कास तुझी धरावी ||
"जय जय रघुवीर समर्थ"

दासबोध/दशक चौथा समास तिसरा : नामस्मरणभक्ति

| श्रीराम् |

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन । आतां ऐका विष्णोःस्मरण । तिसरी भक्ती | १|
स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावें । समाधान | २|
नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं । नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें | ३|
सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये | ४|
हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं । विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें | ५|
कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट । आवस्ता लागतां चटपट । नामस्मरण करावें | ६|
चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये | ७|
संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती । नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये | ८|
वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां । उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये | ९|
आधीं आवदसा मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा । प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये | १०|
नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें | ११|
भूत पिशाच्च नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध । मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती | १२|
नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती । नामें होये उत्तम गती । अंतकाळीं | १३|
बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृधाप्यकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें | १४|
नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी | १५|
उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी । भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें | १६|
हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातापासून सुटला । नारायेणनामें पावन जाला । अजामेळ | १७|
नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । माहापापी तेचि जाले । परम पवित्र | १८|
परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां, येमें- । बाधिजेना | १९|
सहस्रा नामामधें कोणी येक । म्हणतां होतसे सार्थक । नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें | २०|
कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी | २१|
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर । महादोषांचे गिरिवर । रामनामें नासती | २२|
अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला । हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी | २३|
चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लाहानथोर । जढ मूढ पैलपार । पावती नामें | २४|
म्हणौन नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें । तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली | २५|
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनिरूपणनाम समास तिसरा | ३|

सद्गुरु सुबोध - श्री गोंदवलेकर महाराज

नाम सदा बोलावे, गावे भावे, जनांसी सांगावे । हाचि सुबोध गुरुंचा, नामापरते न सत्य मानावे |१|
नामात रंगुनीया व्यवहारी सर्व भोग सेवावे । हाचि सुबोध गुरुंचा, भोगासंगे कुठे न गुंतावे |२|
आनंदात असावे, आळस भय द्वेष दूर त्यागावे । हाचि सुबोध गुरुंचा, अनुसंधाना कधी न चुकवावे |३|
गोड सदा बोलावे, नम्रपणे सर्व लोकप्रिय व्हावे । हाचि सुबोध गुरुंचा, भक्तीने रघुपतीस आळवावे |४|
स्वांतर शुद्ध असावे, कपटाचरणा कधी न वश व्हावे । हाचि सुबोध गुरुंचा, मन कोणाचे कधी न दुखवावे |५|
'माझा राम सखा, मी रामाचा दास' नित्य बोलावे । हाचि सुबोध गुरुंचा, रामापाशी अनन्य वागावे |६|
यत्न कसून करिन मी, यश दे, रामा, न दे तुझी सत्ता । हाचि सुबोध गुरुंचा, मानावा राम सर्वथा कर्ता |७|
आचार संयमाने युक्त, असा नीतिधर्म पाळावा । हाचि सुबोध गुरुंचा, खेळाऐसा प्रपंच मानावा |८|
दाता राम सुखाचा, संसारा मान तू प्रभूसेवा । हाचि सुबोध गुरुंचा, संतोषा सर्वदा मनी ठेवा |९|
स्वार्थ खरा साधा रे, नित्य तुम्ही नामगायनी जागा । हाचि सुबोध गुरुंचा, मीपण जाळोनिया जगी वागा |१०|
अभिमान शत्रू मोठा, सर्वांना जाचतो सुखाशेने । हाचि सुबोध गुरुंचा, मारावा तो समूळ नामाने |११|
राज्याधिकार येवो, किंवा जावो समस्त धन मान । हाचि सुबोध गुरूंचा, भंगावें ना कदा समाधान ॥१२॥
प्रेमात राम रमतो, प्रेमाला मोल ना जगामाजीं । हाचि सुबोध गुरूंचा, गुरूरायाला तहान प्रेमाची ॥१३॥
॥ जानकीजीवनस्मरण जय जय राम ॥

संत तुकाराम महाराज - साखळीचे अभंग

जन्माचे तें मूळ पाहिलें शोधून । दुःखासी कारण जन्म घ्यावा |
पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येऊनी हानी केली |
रजतमसत्व आहे ज्याचे अंगी । याच गुणें जगी वाया गेला |
तम म्हणिजे काय नरकचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ |
तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी || 1 ||

अहर्निशी सदा परमार्थ करावा | पाय न ठेवावा आडमार्गी |
आडमार्गी कोणी जन जे जातील । त्यांतून काढील तोचि ज्ञानी |
तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयासी । वेळोवेळां त्यासी शरण जावे |
आपण तरेल नव्हें ते नवल । कुळें उद्धरील सर्वांची तो |
शरण गेलिया काय होतें फळ । तुका म्हणें कुळ उद्धरिले || 2 ||

उद्धरिले कुळ आपण तरला । तोचि धन्य झाला त्रैलोक्यात |
त्रैलोक्यात भला अद्वैती निमाला । योग जो साधिला साधन बरे |
बरे जे साधन सुख शांत मन । क्रोध नाही जाण तीळभरी |
तीळभरी दोष नाही ते निर्मळ । तुका म्हणे जळ गंगेचे ते || 3 ||

जैसी गंगा वाहे तैसे त्याचे मन । भगवंत जाण तया जवळी |
तया जवळी देव भक्तीभावे उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे |
तया दिसे रूप अंगुष्ठ प्रमाण । अनुभवी खूण जाणती हे |
जाणती जे खूण स्वात्मानुभवी | तुका म्हणे पदवी ज्याची त्याला || 4 ||

ज्याची त्याला पदवी येरा न साजे । संताला उमजे आत्मसुख |
आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाउगी चावटी नका करु |
नका करु काही संतसंग धरा | पूर्वीचा दोर उगवेल |
उगवेल प्रारब्ध संतसंगे करुनी । प्रत्यक्ष पुराणी वर्णियेले |
वर्णियेली कीर्ती नामरूपघोषं । जातील ते दोष तुका म्हणे || 5 ||

दोष हे जातील अनंत जन्मीचे । पाय ते देवाचे न सोडावे |
न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आळवा शारंगधरा भावबळे |
धरुनि केशवा आणा भावबळे । पापियां न कळे काहि केल्या |
न कळे तो देव संतसंगावाचुनी । वासना जाळोनि शुध्द करा |
शुध्द करा मन व्हा रे देहातीत । ओळखा वस्तु ते तुका म्हणे || 6 ||

वस्तु ते ओळखा सांडारे कल्पना । नका आडराना जावूं झणी |
झणी जाल कोठे बुडवाल हीत । विचारी मनांत आपुलिया |
आपुलिया जीवे शिवासी पहावे । घ्यावे आत्मसुख वेळोवेळा |
घ्यावे आत्मसुख स्वरुपी मिळावे । भूती लीन व्हावे तुका म्हणे || 7 ||

भूती लीन व्हावे सांगावे न लगेचि । आता अहंकाराची शांती करा |
शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरी वसावी भूतदया |
भूतदया ठेवी तया काय उणे । प्रथम साधन हेचि असे |
असो जे साधन जया चित्ती वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे || 8 ||

मायाजाळ नासे या नामें करुनि । प्रीती चक्रपाणि असो द्यावी |
असो द्यावी प्रीती साधूचे पायासी । कदा किर्तनासी सोडू नये |
सोडू नये किर्तन पुराणश्रवण । मनन निदिध्यास साक्षात्कार |
साक्षात्कार झालिया सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची || 9 ||

गेली त्याची जाण तोचि ब्रह्म झाला । अंतरी निवाला पूर्णपणे |
पूर्णपणे झाला राहतो कैशा रीती । त्याचि स्थिती सांगतो मी |
सांगतो मी तुम्हा ऐका मनोगत । राहतो मूर्खवत जगामाजी |
जगात पिशाश्च् अंतरी शहाणा । सदाब्रह्मी जाणा निमग्न तो |
निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाहय भेद वेगळाले |
वेगळाले भेद क्लृप्ती त्या असती । हद्गद त्याची गति न कळे कवणा |
न कळे कवणाला तयाचे हे वर्म । योगी जाणे मर्म खूण त्याची |
खूण त्याची जाणे जे का तैसे असती । तुका म्हणे भ्रांती दुजीयाला ||10||

दुजीयाला भ्रांती भाविकाला शांति । साधुचीया वृत्ती लीन झाल्या |
लीन झाल्या वृत्ती ब्रह्मी ते मिळाले । जळांत आटले लवण जैसे |
लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेरी । येत नाही खरे त्यातुनिया |
त्या सारिखे तुम्ही जाणा साधुवृत्ती । पुन्हा न मिळती मायाजाळी |
मायाजाळ त्यांना पुन्हा रे बाधेना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे | 11 |

सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदी |
पदोपदी पहा श्रीमुख चांगले । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची |
विठोबाचे भेंटी घडेल वाचीता । तुम्हालागी आता सांगितले |
सांगितले खरे विश्वाचिया हीता । अभंग वाचिता जे का नर |
ते नर पठणी जीवन्मुक्त झाले । पुन्हा नाही आले संसारासी |
संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे || 12 ||

स्वर्ग लोकीहूनी आले हे अभंग । धाडियले सांग तुम्हांलागी |
नित्यनेमे यांसी पढतां प्रतापें । जळतील पापे जन्मांतरीची |
तया मागे पुढे रक्षी नारायण । मांडिल्या निर्वाण उडी घाली |
बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सदभक्ति येणे पंथे |
सदभक्ति झालिया सहज साक्षात्कार । होईल उध्दार पूर्वजांचा |
साधतील येणे इहपरलोक । सत्य सत्य भाक माझी तुम्हां |
परोपकारासाठी सांगीतले देवा । प्रासादिक मेवा ग्रहण करा |
येणे भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज |

टाळ आणि कंथा धाडिली निशाणी । घ्यारे ओळखोनी सज्जन हो ।
माझे दंडवत तुम्हा सर्व लोकां । देहासहित तुका वैकुंठासी || 13 ||

पांच कोटी एक लक्षाचा शेवट । चौतीससहस्त्र स्पष्ट सांगितले |
सांगितले इतुके कथुनियां गेला । बारा अभंगाला सोडू नका |
सोडूं नका तुम्हा सांगितलें वर्म । भवपाशकर्मे चुकतील
चुकती यातायाती विठोबाची आण । करा हैं पठण जीवेभावे |
जीवेभावें करितां होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे || 14 ||

वेदाचे अभंग केले श्रुतीपर | द्वादश सहस्त्र संहितेचे |
निघंट निरुक्त आणि ब्रह्मसूत्र | अवतार सहस्त्र ऊपग्रंथ |
अभंग ते कोटी भक्तिपर झाले | ज्ञानपर बोलीले तितुकेची |
पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिले | नाम ते गाईले तितुकेची |
साठ लक्ष केला बोध या जनासि | वर्णिले रूपासी तितुकेची |
तीस लक्ष केली देवासी करुणा | कर्मकांड जाणा एक लक्ष |
द्वादश सहस्त्र स्वात्मानुभव | एवं जाणा सर्व संख्या ऐसी |
ऐसे हे अभंग झाले भूतळी | बारा अंतराळी पत्रिकेचे |
चौतीस सहस्त्र लक्ष एक कोटी पाच | सांगोनिया साच गेला तुका || 15 ||

सगुण हे ब्रह्म विठ्ठलची बोले ऐक पा वहिले तुकारामा ||
तुकारामा तुवा केले जे अभंग करिती जे का जगी नित्य पाठ ||
जगी पाठ करीता आवडी सद्भावे विपत्ती न होय त्या प्राण्यासी ||
प्राण्याचे कल्याण होईल बा पाहे भावे वाचिता हे नित्य नेमे ||
नेमे संकष्टाशी करी अकरा पाठ विघ्न त्याचे स्पष्ट दूर होय |||
दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया शेवटी निज ठाया नेईन मी || 16 ||

|| श्री गोपालकृष्णार्पणमस्तु ||

साधनाष्टक (पावस स्वरूपानंद स्वामी)

साधनी असावे तत्पर संकटी न सांडावा धीर
सोऽहं स्मरणे वारंवार निजांतर चोखळावे | 1 |
नाना वृत्तींचे स्फुरण अंतरी होतसे कोठून
साक्षित्वे पहावे आपुले आपण अति अलिप्तपणा ठेवोनिया | 2 |
सर्वेंद्रियासह वर्तमान मन बुद्धी आणि अहंपण
आत्मारामी समर्पून निज-निवांतपण उपभोगावे | 3 |
चालतां बोलतां हिंडता फिरतां लिहितां वाचतां खातां जेवितां
नाना सुखदुःख भोग भोगितां निजात्मसत्ता आठवावी | 4 |
होता सोऽहं-भजनी तन्मय एकवटोनी ज्ञाता ज्ञेय
येई आत्मसुखाचा प्रत्यय अतींद्रिय स्वभावे जे | 5 |
नाद-श्रवण प्रकाश-दर्शन तेथे श्रोता द्रष्टा कोण
तो आत्म चि मी हे ओळखून तद्नुसंधान राखावे | 6 |
सदा स्व रूपानुसंधान हे चि भक्ती हे चि ज्ञान
तेणे तुटोनी कर्म-बंधन परम समाधान प्राप्त होय | 7 |
क्लेश-रहित संतोषी जीवन प्रयाण-काली सोऽहं स्मरण
घडो आवडी परमार्थ-चिंतन आशीर्वचन तुम्हासी हे | 8 |

ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा | १ |
ॐकार हाच परमात्मा आहे असे कल्पून ज्ञानदेवांनी मंगल केले आहे.) हे सर्वांचे मूळ असणाऱ्या व वेदांच्या प्रतिपादनाचा विषय असाणाऱ्या ॐकारा, तुला नमस्कार असो. व स्वत: स्वत:ला जाणण्यास योग्य असणाऱ्या आणि सर्वव्यापी अशा आत्मरूपी ॐकारा तुझा जयजयकार असो. |१-

देवा तूंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी | २ |
वरील विशेषणांनी युक्त अशा) देवा, सर्वांच्या बुद्धीचा प्रकाश जो गणेश तो तूच आहेस. निवृत्तिनाथांचे शिष्य (ज्ञानेश्वर महाराज) म्हणतात, महाराज ऐका. |१-२|

हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष । जेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे | ३ |
संपूर्ण वेद हीच त्या (त्या गणपतीची) उत्तम सजवलेली मूर्ती आहे, आणि तिच्या ठिकाणी निर्दोष वर्णरूपी सौंदर्य खुलून राहिले आहे. |१-

स्मृति तेचि अवयव । देखा आंगीक भाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा | ४ |
आता (त्या गणपतीच्या) शरीराची ठेवण पहा. (मन्वादिकांच्या स्मृति हेच त्याचे अवयव होत. त्या स्मृतीतील अर्थसौंदर्याने (ते अवयव म्हणजे लावण्याची केवळ खाणच बनले आहेत. |१-

अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें । पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांचीं | ५ |
अठरा पुराणे हेच (त्याच्या) अंगवरील रत्नखचित अलंकार आहेत. त्यात प्रतिपादलेली तत्वे हीच रत्ने व छंदोबद्ध शब्द हीच त्यांची कोंदणे होत. |१-

पदबंध नागर । तेंचि रंगाथिलेअंबर । जेथ साहित्य वाणें सपूर ।उजाळाचें | ६ |
उत्तम प्रकारची शब्दरचना हेच त्या गणपतीच्या अंगावरील रंगवलेले वस्त्र आहे आणि त्या शब्दरचनेतील अलंकार हे त्या वस्त्राचे चकचकित तलम तंतु आहेत. |१-६|

देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि | ७ |
पहा, कौतुकाने काव्य-नाटकांविषयी विचार केला असता ती काव्य-नाटके त्या गणपतीच्या पायातील लहान घागऱ्या असून त्या अर्थरूप आवाजाने रुणझुणत असतात. |१-७|

नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी । दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं | ८ |

कारण त्यात प्रतिपादलेली अनेक प्रकारची तत्वे व त्यातील कुशलता यांचा बारकाईने विचार केला असता यामधेही निवडक वेच्यांची काही चांगली रत्ने आढळतात. |१-८|

तेथ व्यासादिकांच्या मतीं । तेचि मेखळा मिरवती । चोखाळपणें झळकती । पल्लवसडका | ९ |

येथे व्यासादिकांच्या बुद्धी हाच कोणी (त्या गणपतीच्या) कमरेला बांधलेला शेला शोभत आहे व त्याच्या पदराच्या दशा निर्दोषपणे झळकत आहेत. |१-९|

देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेची भुजांची आकृति । म्हणौनि विसंवादे धरिती । आयुधें हातीं | १० |

पहा, सहा शास्त्रे म्हणून जी म्हणतात तेच गणपतीचे सहा हात आहेत आणि म्हणून भिन्न भिन्न मते हीच त्याच्या हातातील शस्त्रे आहेत. |१-१०|

तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु । वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे | ११ |

तरी कणादशास्त्ररूपी हातामधे अनुमानरूपी परशु आहे. गौतमीय न्यायदर्शनरूपी हातात प्रमाण-प्रमेयादि षोडष पदार्थांचे तत्वभेदरूपी अंकुश आहे. व्यासकृत वेदांतसूत्ररूपी हातात ब्रह्मरसाने भरलेला ब्रह्मज्ञानरूपी मोदक शोभत आहे. |१-१

एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु । तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा | १२ |

बौद्धमताचे निदर्शन करणाऱ्या बौद्धवार्तिकांनी प्रतिपादलेले बौद्धमत हाच कोणी स्वभावत: खंडित झालेला दात तो पातंजलदर्शनरूपी एका हातात धरला आहे. |१-१२|

मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु । धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु | १३ |

मग (बौद्धांच्या शून्यवादाचे खंडन झाल्यावर) सहजच येणारा निरीश्वर सांख्यांचा सत्कार्यवाद हा त्या गणपतीचा वर देणारा कमलासारखा हात होय. |१-१

देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु । जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा | १४ |

पहा. त्या गणपतीच्या ठिकाणी सोलीव ब्रह्मसुखाचा निरतिशय आनंद हीच सरळ, अति निर्मळ व बरेवाईटाची निवड करण्यात समर्थ अशी लांब सोंड आहे |१-१

तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु । देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु | १५ |
तर प्रश्नोत्तररूप चर्चा हाच दात असून त्या चर्चेतील पक्षरहितपणा हा त्या दाताचा पांढरा रंग आहे. ज्ञानरूप बारीक डोळे असलेला विघ्नांचा नियामक असा हा देव आहे. |१-१

मज अवगमलिया दोनी । मिमांसा श्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी । अली सेविती | १६ |
(ज्ञानदेव म्हणतात) पूर्वमीमांसा व उत्तर मीमांसा ही शास्त्रे हीच त्या गणपतीच्या दोन्ही कानांच्या ठिकाणी मला वाटतात व बोध हेच मदरूपी अमृत असून मुनि हे भ्रमर त्याचे सेवन करतात. |१-१६|

प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ । सरिसेपणें एकवटत इभ- । मस्तकावरी | १७ |
वर संगितलेल्या श्रुति-स्मृति वगैरेत प्रतिपादलेली तत्वे हीच त्या गणपतीच्या अंगावर तेजदार पोवळी होत व द्वैत आणि अद्वैत मते हीच त्या गजवदनाच्या मस्तकावरील गंडस्थळे असून ती तुल्यबलाने तेथे एकत्र राहिलेली आहेत. |१-१७|

उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदे । तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभती भलीं | १८ |
ज्ञानरूपी मध देण्यात उदार असलेली ईशावास्यादि दशोपनिषद्रूप सुगंधी फुले गंडस्थळावर असलेल्या मुकुटाच्या ठिकाणी चांगली शोभतात |१-१८|

अकार चरण युगल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारें | १९ |
ॐकाराची प्रथम अकारमात्रा हे त्या गणपतीचे दोन पाय असून, दुसरी उकारमात्रा हे त्याचे मोठे पोट आहे आणि तिसरी मकारमात्रा हाच त्याच्या मोठ्या व वाटोळ्या मस्तकाचा आकार आहे. |१-१९|

हे तीन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें । तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज | २० |
ह्या तिन्ही मात्रा एकत्र झाल्या म्हणजे संपूर्ण वेद कवटाळला जातो. त्या मूळ बीजरूपी गणेशाला मी गुरुकृपेमुळे नमस्कार करतो. |१-२०|

आतां अभिनव वाग्विलासिनी । ते चातुर्यार्थकलाकामिनी । ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां | २१ |

आता जी वाणीची अपूर्व क्रीडा करणारी असून, चातुर्य, वागर्थ व कला यांची देवता आहे. व जिने सर्व जग मोहून टाकले आहे, त्या सरस्वतीला मी वंदन करतो. |१-२

मज हृदयीं सद्‌गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु । म्हणौनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी | २२ |

ज्या सद्गुरूंनी मला या संसारपुरातून तारले ते माझ्या हृदयात आहेत. म्हणून माझे विवेकावर फार प्रेम आहे. |१-२२|

जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग वास पाहिजे तेथ । प्रगटे महानिधी | २३ |

ज्याप्रमाणे डोळ्यात अंजन घातले की दृष्टी फाकते व मग (भूमिगत) द्रव्याचा सहज सुगावा लागून द्रव्याचा मोठा खजिना दृष्टीला दिसू लागतो. |१-२

कां चिंतामणी जालियां हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेवो म्हणे | २४ |

किंवा ज्याप्रमाणे चिंतामणी हस्तगत झाल्यावर मनोरथ नेहेमी विजयी होतात, त्याप्रमाणे माझे सर्व मनोरथ श्री निवृत्तिनाथांच्यामुळे पूर्ण झाले आहेत. असे ज्ञानदेव म्हणतात. |१-२

म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होईजे । जैसें मुळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती | २५ |

एवढ्यासाठी अहो ज्ञातेपुरुष हो, गुरुभजन करावे व त्यायोगे कृतकृत्य व्हावे. ज्याप्रमाणे झाडाच्या मुळांना पाणी घातले असता अनायासे फांद्या व पाने यांना टवटवी येते |१-२

कां तीर्थें जियें त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं । ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ | २६ |

अथवा समुद्रस्नानाने त्रैलोक्यात जेवढी तीर्थे आहेत तेवढी घडतात, किंवा अमृतरसाच्या सेवनाने सर्व रसांचे सेवन घडते, |१-२६|

तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि । जो अभिलषित मनोरुचि । पुरविता तो | २७ |

त्याप्रमाणे (श्रीगुरूंना वंदन केले म्हणजे सर्वांनाच वंदन केल्यासारखे होत असल्यामुळे) मी त्याच श्रीगुरूंना पूज्यता बुद्धीने वारंवार वंदन केले. (कारण की) तो इच्छिलेल्या मनाच्या आवडी पुरवणारा आहे. |१-२७|

आतां अवधारा कथा गहन । जे सकळां कौतुकां जन्मस्थान ।कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें | २८ |

(श्रीगुरूंना वंदन केल्यानंतर) आता (ज्यात गीता निर्माण झाली अशा महाभारताची) खोल विचारांनी भरलेली कथा. तिचे माहात्म्य ऐका. ही कथा सर्व चमत्कारांची खाण आहे. किंवा विचाररूपी वृक्षांचा बगिचा आहे. |१-२८|

ना तरी सर्व सुखाचि आदि । जे प्रमेयमहानिधि । नाना नवरससुधाब्धि । परिपुर्ण हे | २९ |

अथवा ही सर्व सुखांचे उगमस्थान आहे. अनेक सिद्धांतांचा साठा आहे, किंवा श्रृंगारादी नवरसरूपी अमृताने भरलेला समुद्र आहे. |१-२९|

कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचे मूळपीठ । शास्त्रजाता वसौट । अशेषांचें | ३० |

किंवा ही कथा प्रत्यक्ष मोक्ष असून सर्व विद्यांचे मूलस्थान आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण शास्त्रांमधे ही श्रेष्ठ आहे. |१-३०|

ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचे जिव्हार । लावण्यरत्न भांडार । शारदेचें | ३१ |

किंवा ही (कथा) सर्व धर्मांचे माहेरघर आहे, सज्जनांचा जिव्हाळा आहे, सरस्वतीच्या सौंदर्यरूप रत्नांचा जामदारखाना आहे. |१-३

नाना कथारूपें भारती । प्रकटली असे त्रिजगतीं । आविष्करोनि महामतीं । व्यासाचिये | ३२ |

अथवा व्यासांच्या विशाल बुद्धिमध्ये स्फुरूण पावून सरस्वती या कथेच्या रूपाने त्रिजगतात प्रगट झाली आहे. |१-३२|

म्हणौनि हा काव्यांरावो । ग्रंथ गुरुवतीचा ठावो । एथूनि रसां झाला आवो । रसाळपणाचा | ३३ |

म्हणून हा महाभारत ग्रंथ सर्व काव्यग्रंथाचा राजा आहे. या ग्रंथाच्या ठिकाणी मोठेपणाची कमाल झाली आहे व येथूनच रसांना रसाळपणाचा डौल आला आहे. |१-३

तेवींचि आइका आणिक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक । आणि महाबोधीं कोंवळीक । दुणावली | ३४ |

त्याचप्रमाणे याची आणखी एक महती ऐका. यापासूनच शब्दांच्या संपत्तीला निर्दोष शास्त्रीयता आली आहे. त्यामुळे ब्रह्मज्ञानाची मृदुता वाढली आहे. |१-३

एथ चातुर्य शहाणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ | ३

येथे (या महाभारतग्रंथात) चतुरता शहाणी झाली, तत्वांना गोडी आली व सुखाचे ऐश्वर्य येथे पुष्ट झाले. |१-३

माधुर्यीं मधुरता । श्रृंगारीं सुरेखता ।रूढपण उचितां । दिसे भलें | ३६ |

गोडीचा गोडपणा, श्रृंगाराचा सुरेखपणा व योग्य वस्तूंना आलेला रूढपणा यापासूनच दिसू लागला. |१-३६|

एथ कळाविदपण कळा । पुण्यासि प्रतापु आगळा । म्हणौनि जनमेजयाचे अवलीळा । दोष हरले | ३७ |

येथून कलांना कुशलता प्राप्त झाली, पुण्याला विशेष तेज चढले व म्हणूनच (महाभारताच्या पठणाने) जनमेजयाचे दोष हरले. |१-३७|

आणि पाहतां नावेक । रंगीं सुरंगतेची आगळीक । गुणां सगुणपणाचें बिक । बहुवस एथ | ३८ |

आणि क्षणभर विचार केला तर असे दिसून येते की रंगांमधे सुरंगतेची वाढ झाली आहे. (आनंदाला विशेष मनोहरता आली आहे). त्यामुळे सद्गुणांना चांगुलपणाचे विशेष सामर्थ्य प्राप्त झाले आहे. |१-३८|

भानुचेनि तेजें धवळलें । जैसे त्रैलोक्य दिसे उजळिलें । तैसें व्यासमति कवळिलें । मिरवे विश्व | ३९ |

सूर्याच्या प्रकाशाने प्रकाशित झालेले त्रैलोक्य ज्याप्रमाणे उज्वल दिसते त्याप्रमाणे व्यासांच्या बुद्धीने व्यापलेले विश्व शोभते. |१-३९|

कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलियापरी विस्तारलें । तैसें भारतीं सुरवाडलें । अर्थजात | ४० |

किंवा उत्तम जमिनीत बी पेरले असता त्याचा जसा हवा तसा विस्तार होतो, त्याप्रमाणे भारतामधे चार पुरुषार्थ हवे तेवढे प्रफुल्लित झाले आहेत. |१-४०|

ना तरी नगरांतरीं वसिजे । तरी नागराचि होईजे ।तै सें व्यासोक्तितेजें । धवळत सकळ | ४१ |
अथवा शहरात राहिल्याने मनुष्य जसा चाणाक्ष होतो त्याप्रमाणे व्यासांच्या वाणीतील तेजाने सर्व गोष्टी उज्वल (स्पष्ट) झाल्या आहेत. |१-४

कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं | ४२ |
किंवा तारुण्यावस्थेत स्त्रियांच्या ठिकाणी ज्याप्रमाणे सौंदर्याचा बहर अधिक उठावदार दिसतो |१-४२|

ना तरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलापासौनि अपाडें । जियापरी | ४३ |
किंवा बगिच्यात वसंत ऋतूने प्रवेश केला असता तेथील सर्व झाडांच्या सौंदर्याची पूर्वीपेक्षा ज्याप्रमाणे असाधारण अशी खाण उघडते |१-४

नानाघनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण । मग अलंकारीं बरवेपण । निवाडु दावी | ४४ |
अथवा सोन्याची लगड पाहिली असता ते सोने साधारण दिसते (डोळ्यात भरत नाही) पण त्याच लगडीचे दागिने बनवल्यावर तेच सोने आपले निराळेच सौंदर्य दाखवते |१-४

तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें । तें जाणोनि काय आश्रयिलें । इतिहासीं | ४५ |
त्याप्रमाणे व्यासांच्या बोलण्याने अलंकृत झाले असता हवा तसा चांगलेपणा येतो, हे समजूनच की काय पूर्वीच्या कथानकांनी भारताचा आश्रय घेतला. |१-४

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं । सानीव धरूनि आंगीं । पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं | ४६ |
अथवा जगामधे पूर्ण मोठेपणा प्राप्त व्हावा म्हणून स्वत:च्या ठिकाणी लहानपणा घेऊन पुराणांनी आख्यानरूपाने भारतात प्रवेश केला. |१-४६|

म्हणौनि महाभारतीं नाहीं । तें नोहेचि लोकीं तिहीं । येणें कारणें म्हणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय | ४७ |

एवढ्याकरता महाभारतामधे जे नाही ते त्रैलोक्यातही नाही. या कारणामुळे संपूर्ण त्रैलोक्य व्यासांचे उष्टे आहे असे म्हटले जाते. (म्हणजे व्यासांच्या नंतर झालेल्या कवींनी आपल्या सर्व कल्पना व्यासांपासून उसन्या घेतल्या आहेत.) |१-४७|

ऐसी जगीं सुरस कथा । जें जन्मभूमि परमार्था । मुनि सांगे नृपनाथा । जनमेजया | ४८ |

अशी जगात सुरस म्हणून प्रसिद्ध असलेली व ब्रह्मज्ञानाला जन्म देणारी ही भारतीय कथा राजश्रेष्ठ जनमेजय राजाला वैशंपायन ऋषींनी सांगितली. |१-४८|

जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम । परम मंगलधाम । अवधारिजो | ४९ |

ऐका हे महाभारत अद्वितीय, उत्तम, अतिपवित्र, निरुपम आणि श्रेष्ठ असे कल्याणाचे ठिकाण आहे. |१-४९|

श्री एकनाथी भागवतातील गणेश स्तुती

श्रीगणाधिपतये नमः | श्रीगुरुभ्यो नमः |

ॐ नमो जी जनार्दना । नाही भवाभवभावना । रेखोनि मी तूं पणा । नमन श्रीगुरुचरणा सद्गुरुराया |
नमन श्रीएकदंता । एकपणे तूंचि आता । एकी दाविसी अनेकता । परी एकात्मता न मोडे | २|
तुजमाजी वासु चराचरा । म्हणौनि बोलिजे लंबोदरा । यालागीं सकळांचा सोयरा । साचोकारा तू होसी |
तुज देखे जो नरु । त्यासी सुखाचा होय संसारू । यालागीं विघ्नहरू । नामादरू तुज साजे |
हरूष ते वदन गणराजा । चाही पुरुषार्थ त्याचि चारहि भुजा । प्रकाशिया प्रकाशी वोजा। तो झळकत तझा निजदंतु | ५ | पूर्वउत्तरमीमांसा दोनी । लागलिया श्रवणस्थानी । निःशब्दादि वाचा वदनी । कर जोडूनि उभिया | ६|
एकेचि काळी सकळ सृष्टी । आपलेपणे देखत उठी । तेचि तुजी देखणी दृष्टी । सुखसंतुष्टी विनायका | ७|
सुखाचें पेललें दोंद । नाभी आवर्तला आनंद । बोधाचा मिरवे नागबंद । दिसे सन्निध साजिरा | ८|
शुद्धसत्त्वाचा शुक्लांबर । कासे कसिला मनोहर । सुवर्णवर्ण अलंकार । तुझेनि साचार शोभती | ९|
प्रकृतिपुरुष चरण दोनी । तळी घालिशी वोजावुनी । तयांवरी सहजासनीं। पूर्णपणी मिरवसी |१०|
तुझी अणुमात्र झालिया भेटी । शोधितां विघ्न न पडे दृष्टी । तोडिसी संसारफांसाटी । तोचि तुझे मुष्टी निजपरशु |१ भावें भक्त जो आवडे । त्याचे उगविसी भवसांकडें । वोढुनि काढिसी आपणाकडे । निजेनिवाडे अंकुशे | १२ |
साच निरपेक्ष जो निःशेख । त्याचें तूं वाढविसी सुख । देऊनि हरिखाचे मोदक । निववसी देख निजहस्ते | १३ | सूक्ष्माहूनि सूक्ष्म सान । त्यामाजी तुझें अधिष्ठान । यालागी मूषकवाहन । नामाभिधान तुज साजे | १४ |
पाहतां नरू ना कुंजरू । व्यक्ताव्यक्तासी परू । ऐसा जाणोनि निर्विकारू । नमनादरू ग्रंथार्थी | १
ऐशिया जी गणनाथा । मीपणे कैंचा नमिता । अकर्ताचि जाहला कर्ता । ग्रंथकथाविस्तारा |१६ |
आतां नमूं सरस्वती । जे सारासारविवेककर्ती । चेतनारूपें इंद्रियवृत्ती । जे चाळिती सर्वदा | १७ |
जे वाचेची वाचक । जे बुद्धीची योतक । जे प्रकाशा प्रकाशक । स्वयें देख स्वप्रभ |१८|
ते शिवांगी शक्ति उठी । जैसी डोळ्यांमाजी दिठी । किंवा सुरसत्वें दावी पुष्टी । फळपणे पोटीं फळाच्या |१९|

जैसा साखरेअंगी स्वादु । की सुमनामाजी मकरंदु । तसा शिवशक्तिसंबंधू । अनादिसिद्धु अतर्क्य | २० |

जे अनिर्वाच्य निजगोडी । चहूं वाचांमाजी वाडी । म्हणोनि वागीश्वरी रोकडी । ग्रंथार्थी रोकडी चवी दावी | २१ | सारासार निवडिती जनीं । त्या हंसावरी हंसवाहिनी । बैसली सहजासनी । अगम्यपणी अगोचरू | २२ |

ते परमहंसी आरुढ । तिसी विवेकहंस जाणती दृढ । जवळी असतां न देखती अभाग्य मूढ अतिमंद | २३ |

तिचें निर्धारितां रूप । अरूपाचें विश्वरूप । तें आपुलेपणें अमूप । कथा अनुरूप बोलवी | २४ |

हा बोलु भला झाला । म्हणोनि बोलेंचि स्तविला । तैसा स्तुतिभावो उपजला । बोलीं बोला गौरवी | २५ |

ते वाग्विलास परमेश्वरी । सर्वांगदेखणी सुंदरी । राहोनि सबाह्यअभ्यंतरीं । ग्रंथार्थकुसरी वदवी स्वयें | २६ |

ते सदा संतुष्ट सहज । म्हणोनि निरूपणा चढलें भोज । परी वक्तेपणाचा फुंज । मीपणें मज येवों नेदी | २७ |

वाग्देवतेची स्तुती । वाचाचि जाहली वदती । तेथें द्वैताचिये संपत्ती । उमस चित्तीं उमजेना | २८ |

तिणें बोल बोलणें मोडिलें । समूळ मौनातें तोडिलें । त्यावरी निरूपण घडिलें । न बोलणें बोलें बोलवी |२९ |

तिसी सेवकपणें दुसरा । होऊनि निघे नमस्कारा । तंव मीपणेंसीं परा । निजनिर्धारा पारुषे | ३० |

जेथें मीपणाचा अभावो । तेथें तूंपणा कैंचा ठावो । याहीवरी करी निर्वाहो । अगम्य भावो निरूपणीं | ३१ |

जैशा सागरावरी सागरीं । चालती लहरींचिया लहरी । तैसे शब्द स्वरूपाकारीं ।स्वरूपावरी शोभती |३२|

जैशा साखरेचिया कणिका । गोडिये भिन्न नव्हती देखा । तैसें निरूपण ये रसाळसुखा । ब्रह्मरसें देखा समवृत्ति | ३३ |

तेथें मीपणेंशीं सरस्वती । बैसविलें एका ताटें रसवृत्ती । तेणें अभिन्नशेष देऊनि तृप्ती । ते हे उद्‌गार येती कथेचे | ३४ |

आतां वंदू ते सज्जन । जे कां आनंदचिद्‌घन । वर्षताती स्वानन्दजीवन । संतप्त जन निववावया | ३५ |

ते चैतन्याचे अळंकार । कीं ब्रह्मविद्येचे शृंगार । कीं ईश्वराचें मनोहर । निजमंदीर निवासा | ३६ |
ते अधिष्ठाना अधिवासु । कीं सुखासही सोल्हासु । विश्रांतीसी विश्वासू । निजरहिवासू करावया | ३७ |
कीं ते भूतदयार्णव । कीं माहेरा आली कणव । ना ते निर्गुणाचे अवेव । निजगौरव स्वानंदा | ३८ |
ना ते डोळ्यातील दृष्टी । कीं तिचीही देखणी पुष्टी । कीं संतुष्टीसी तुष्टी । चरणांगुष्ठीं जयांचे | ३९ |
ते पाहती जयांकडे । त्यांचें उगवे भवसांकडें । परब्रह्म डोळियांपुढें । निजनिवाडें उल्हासे | ४० |
तेथें साधनचतुष्टयसायास । न पाहती शास्त्रचातुर्यविलास । एका धरिला पुरे विश्वास । स्वयें प्रकाश ते करिती | ४१ |
ते जगामाजीं सदा असती । जीवमात्रातें दिसती । परी विकल्पेंचि ठकिजती । नाहीं म्हणती नास्तिक्यें | ४२ |
मातियेचा द्रोण केला । तो कौळिका भावो फळला । म्हणौनि विश्वासेंवीण नाडला । जगु ठकला विकल्पें | ४३ | एकाएकीं विश्वासतां । तरी वाणी नाहीं निजसत्ता । त्यांचे चरणी भावार्थता । ठेविला माथां विश्वासें | ४४ |
ते नमस्कारितां आवश्यक । करून ठाकती एक । परी एकपणें सेवक । त्यांचाचि देख स्वयें होआवें | ४५ |
त्यांचिया सेवेचिये गोडी । ब्रह्मसुखाची उपमा थोडी । जे भजती अनन्य आवडीं । ते जाणती गाढी निजचवी | ४६ |
ते प्रकृतीसी पर । प्रकृतिरूपीं ते अविकार । आकार-विकार-व्यवहार । त्यांचेनि साचार बाधीना | ४७ |
ते भोगावरी न विटती । त्यागावरी न उठती । आपुलिये सहजस्थिती । स्वयें वर्तती सर्वदा | ४८ |
ते ज्ञातेपणा न मिरविती । पिसेपण न दाविती । स्वरूपफुंजुविस्मृती । गिळूनि वर्तती निजांगें | ४९ |
मा अंगींचि जिराला । विस्मयो येवोंचि विसरला । प्रपंचुपरमार्थु एकु जाहला । हाही ठेला विभागु | ५० |
स्मरण विस्मरणेंशीं गेलें । देह देहींच हारपलें । आंतुबाहेरपण गेलें । गेलें ठेलें स्मरेना | ५१ |
स्वप्न जागृती जागतां गेली । सुषुप्ती साक्षित्वेंसीं बुडाली । उन्मनीही वेडावली । तुर्या ठेली तटस्थ | ५२ |
दृश्य द्रष्टेनशीं गेलें । दर्शन एकलेपणें निमालें । तें निमणेंपणही विरालें । विरवितें नेलें विरणेनी | ५३ |

ज्ञान अज्ञानातें घेऊनि गेलें । तंव ज्ञातेपणही बुडालें । विज्ञान अंगी जडलें । परी नवें जडलें हें न मनी | ५४ |

यापरी जे निजसज्जन । तिहीं व्हावें सावधान । द्यावें मज अवधान । हें विज्ञापन बाळत्वें | ५५ |

सूर्य सदा प्रकाशघन । अग्नि सदा देदीप्यमान । तैसे संत सदा सावधान । द्यावें अवधान हें बालत्व माझें | ५६ |

श्रीदासबोध दशक पहिला 'गणेशस्तवननाम' समास दुसरा

ॐ नमोजि गणनायेका । सर्व सिद्धिफळदायेका । अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा |
सर्वसिद्धींचा फळदाता, अज्ञान व विपरीत ज्ञान नष्ट करणाऱ्या बोधरूप अशा गणनायकास मी वंदन करतो. (१)
माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें । मज वाग्सुंन्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी | २|
आपण माझे अंतःकरणास व्यापून सर्वकाळ तेथे वास्तव्य करावे आणि आपल्या कृपाकटाक्षाने माझे अज्ञान दूर करून माझ्या मुखाने ग्रंथ वदवून घ्यावा. (२)
तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें । आणी विश्वभक्षक काळें । दास्यत्व कीजे |
तुझ्या कृपेच्या योगे भ्रांतीची पटले वितळून जातात. एवढेच नव्हे तर विश्वभक्षक काळही तुझ्या कृपेने दास बनतो. (३)
येतां कृपेची निज उडी । विघ्नें कापती बापुडीं । होऊन जाती देशधडी । नाममात्रें |
गणेशाची कृपा झाली की विघ्ने चळचळा कापू लागतात. त्याच्या केवळ नामस्मरणानेही ती देशोधडीला लागतात. (४)
म्हणौन नामें विघ्नहर । आम्हां अनाथांचे माहेर । आदिकरूनी हरीहर । अमर वंदिती |
म्हणूनच गजाननाला 'विघ्नहर' नावाने संबोधले जाते. आमच्यासारख्या अनाथांना त्याचा मोठाच आधार वाटतो. हरिहरादी देवही त्याच्या चरणी वंदन करीत असतात. (५)
वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी । आघात अडथाळे उपाधी । बाधूं सकेना | ६|
सर्व मंगलाचे निधान अशा गणेशाला वंदन करून कार्यारंभ केला असता त्या कार्यात सर्वप्रकारे यश प्राप्त होते. ते करीत असताना संकटे ,अडथळे इत्यादी उपाधींची बाधा होऊ शकत नाही. (६)
जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगी | ७|
मनात त्याच्या रूपाचे चिंतन करू लागले, तरीही मनाला परम समाधान वाटते. चंचल मन स्थिर होऊन नेत्रांच्या ठिकाणी एकाग्र होते. (७)
सगुण रूपाची टेव । माहा लावण्य लाघव । नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती | ८|
गणेशाच्या सगुण रूपाचे लावण्य व कौशल्य अत्यंत चित्ताकर्षक असून तो जेव्हा नृत्य करू लागतो, तेव्हा सर्व देव देहभान विसरून तटस्थ होऊन त्याच्याकडे पाहातच राहातात. (८)
सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदे डुल्लत । हरूषें निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु | ९|
त्याच्या गंडस्थळातून सतत मद गळत असतो, तो सदा आनंदाने डुलत असतो व अत्यंत आनंदाने उल्लसित झालेले त्याचे सुप्रसन्न वदन आपले चित्त आकर्षित करून घेते. (९)
भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहा प्रचंड । विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला | १०|
त्याचे रूप भव्य, दिव्य असून, देह अत्यंत विशाल व महाप्रचंड आहे. त्याचा भालप्रदेश विस्तीर्ण असून, त्यावर सिंदूर लावलेला आहे. (१०)

नाना सुगंध परिमळें । थबथबा गळती गंडस्थळें । तेथें आलीं षद्ददकुळें । झुंकारशब्दें | १
त्याच्या गंडस्थळातून थबथबा मदस्राव होत असतो व त्या मदस्रावातून दरवळणाऱ्या सुगंधांच्या परिमळामुळे आकर्षिले जाऊन भुंग्यांचे थवे मधुर गुंजारव करीत त्या गंडस्थळाभोवती रुंजी घालू लागतात. (११)

मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें । लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्षणा मंदसत्वी | १२|
गणेशाची सोंड सोटासारखी सरळ पण टोकास मुरडलेली आहे. कपाळावर दोन सुंदर आवाळे शोभत असतात. खालचा ओठ जरा लोंबत असतो आणि उग्र गंध असलेला मद क्षणक्षणाला गळत असतो. (१२)

चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी । लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा | १
गणेश हा चौदा विद्यांचा स्वामी असून, त्याचे डोळे फार लहान आहेत. त्या सूक्ष्म दृष्टीने तो सर्वत्र न्याहाळून पाहात असतो. त्याचे कान खूप मोठे व लवलवित असून, त्यांना तो सुपासारखे सतत फडफडा हलवीत असतो, तेव्हा त्यांचा फडफड आवाज येतो. (१३)

रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ । कुंडलें तळपती नीळ । वरी जडिले झमकती | १
त्याच्या मस्तकावर नाना रत्ने ज्यांत जडविलेली आहेत, असा रत्नजडित मुकुट आहे व त्यातून नाना रंगांच्या प्रकाशाचे किरण सर्वत्र फाकले जाऊन अपूर्व झळाळीने आपले डोळे जणू दिपतात. कानात नीलमण्यांनी जडलेली कुंडले झगमगत असतात. (१४)

दंत शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु | १
त्याचे दात पांढरे शुभ्र व ठसठशीत आहेत आणि त्यांच्या टोकाला सुवर्णाची रत्नजडित कडी बसवलेली असून, त्यांच्या खालच्या बाजूला छोटी छोटी सोन्याची पाने तळपत असतात. (१५)

लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें | १६|
त्याचे पोट लवलवीत असून सारखे हालत असते व त्याला सर्पाचा कडदोरा वेढलेला असतो. कमरेच्या साखळीच्या छोट्या छोट्या घुंगुरांचा मंद मंद मधुर ध्वनी ऐकू येतो. (१६)

चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पितांबर । फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी | १७|
त्याला चार हात असून लंबोदरावर सोनसळी पीतांबर नेसलेला आहे, तर पोटावरील मोठा नाग सारखे फूत्कार यकतो. (१७)

डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेटाळी । उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे | १८|
तो नाग कमरेला वेढा घालून बसलेला असून गणेशाच्या नाभिकमळाजवळ फणा उभारून मस्तक डोलवत जिभल्या चाटत सर्वत्र टकमका पाहतो. (१८)

नाना याति कुशुममाळा । व्याळपरियंत रुळती गळां । रत्नजडित हृदयकमळा- । वरी पदक शोभे | १९|

त्याच्या गळ्यात विविध जातीच्या फुलांच्या माळा कमरेतील सापापर्यंत पोहोचतील अशा लांबलचक रुळत असतात व हृदयावर रत्नजडित हारांतील पदक अत्यंत शोभून दिसते. (१९)

शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ । येके करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीति | २०|

चारी हातांपैकी एका हातात परशू , एका हातात कमळ, एका हातात अत्यंत तीक्ष्ण व तेजस्वी अंकुश तर एका हातात त्याला अत्यंत प्रिय असणाऱ्या मोदकाचा गोळा शोभून दिसतो. (२०)

नट नाट्य कळा कुंसरी । नाना छंदें नृत्य करी । टाळ मृदांग भरोवरी । उपांग हुंकारे | २

गणेश हा नृत्य, नाट्य इत्यादी कलांमध्ये अत्यंत कुशल असून टाळ, मृदंगाच्या तालावर नृत्याचे उपांग जे हुंकार ते करीत नानाप्रकारे नृत्य करतो. (२१)

स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशईं अग्रगण । साअजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी | २२|

इतका विशाल व थुलथुलीत देह असूनही चपलतेमध्ये गणेश अग्रगण्य असून क्षणभरही स्वस्थ राहात नाही. त्याची साजिरी मूर्ती सुलक्षण व लवण्याची जणू खाणच आहे. (२२)

रुणझुणा वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें । घागरियासहित मनोहरें । पाउलें दोनी | २

पायांत नूपुरे रुणझुणत असतात, दंडांतील वाक्यांचा मधुर ध्वनी होत असतो, तर मधुर झंकारणाऱ्या घागऱ्यांमुळे दोन्ही पाउले भक्तांचे मन हरण करीत असतात. (२३)

ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा । साहित्यविशईं सुल्लभा । अष्टनायका होती | २

गणपतीमुळे देवांच्या सभेला शोभा येते. त्याच्या दिव्य वस्त्रांची प्रभा सर्वत्र पसरलेली असते. त्याच्या कृपेमुळेच साहित्य निर्मितीच्यावेळी अष्टनायिका साह्य करू लागतात. (२४)

ऐसा सर्वांगे सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु । त्यासी माझा नमस्कारु । साष्टांग भावें | २

श्री समर्थ म्हणतात, असा जो सर्वांगाने सुंदर असणारा, सकळ विद्यांचे वसतिस्थान असा श्रीगणेश त्यास मी साष्टांग भावाने नमस्कार करतो. (२५)

ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होये भ्रांता । गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती | २६|

त्या गणेशाच्या रूपाचे वर्णन केले असता भ्रमित- चित्त माणसाच्या बुद्धीतही ज्ञानाचा प्रकाश पडतो. त्याच्या गुणांचे श्रवण केल्याने प्रत्यक्ष सरस्वती प्रसन्न होते. (२६)

जयासि ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती । असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा | २७|

ज्यास ब्रह्मादी देवही वंदन करतात, त्यापुढे बिचारे मानव ते काय म्हणावेत ? म्हणून मंदमती असणारांनीही श्रीगणेशाचे चिंतन करावे. (२७)

जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण । तेचि होती दक्ष प्रविण । सर्वविशईं | २८|
कारण जे कुणी मूर्ख अवलक्षणी, अथवा हीनांहूनही हीन असतील, तेही श्रीगणेशाच्या कृपेने अत्यंत चतुर व सर्व विषयांत पारंगत होऊ शकतात. (२८)
ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ । सप्रचीत भजनस्वार्थ । कल्लौ चंडीविनायेकौ | २९|
असे गणेशाचे अपार सामर्थ्य आहे. त्याची कृपा झाली असता भक्तांचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन त्यांना अनुभवयुक्त परमार्थाची प्राप्ती होते. कलियुगात देवी (चंडी) व गणेशाची उपासना करावी, असे शास्त्र सांगते. (२९)
ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला येथामति । वांछ्या धरूनि चित्तीं । परमार्थाची | ३०|
म्हणून अशा मंगलमूर्ती गणेशाची स्तुती मी मनात परमार्थाची इच्छा धरून यथामती केली आहे. (३०)
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
गणेशस्तवननाम समास दुसरा | २ |
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवाादे 'गणेशस्तवननाम' समास दुसरा समाप्त

दासबोध दशक पहिला – समास तिसरा : शारदास्तवन
| श्रीराम |
आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता । शब्दमूल वाग्देवता । माहं माया |
मी आता वेदांची जननी, ब्रह्मदेवांची कन्या, शब्दब्रह्माची उत्पत्ती जिच्यापासून झाली त्या वाग्देवतारूपी महामायेला, श्रीशारदेला वंदन करतो. (१)
जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार । जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी | २|
तिच्यापासूनच शब्द स्फुरतात व वैखरी वाणीच्या रूपाने तिचाच अपार विस्तार होतो. तीच शब्दांचे विविध अर्थ उकलून दाखवते. (२)
जे योगियांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी । जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी |
योग्यांच्या ठिकाणी समाधिरूपाने तर धैर्यवान पुरुषांच्या ठिकाणी निश्चयी बुद्धीच्या रूपाने राहून तीच विद्या व अविद्या या दोन्ही उपाधी तोडून टाकून स्वरूपी लीन करते. (३)
जे माहापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्था तुर्या । जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधु |
ती ईश्वराची भार्या असून प्रत्यगात्मा ब्रह्माच्या अत्यंत निकट असणारी तुर्यावस्थाही तीच आहे. तिच्या आधारानेच साधुपुरुष महान कार्ये करण्यास प्रवृत्त होतात. (४)
जे महंतांची शांती । जे ईश्वराची निज शक्ती । जे ज्ञानियांची विरक्ती । नैराशशोभा |
ती महंताची शांती असून ईश्वराची निजशक्ती आहे, तर ज्ञानी लोकांच्या ठिकाणी ती विरक्तिरूपाने प्रगटून नैराश्य रूपाने शोभत असते. (५)

जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळाविनोदेंचि मोडी । आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे | ६|
ती सहज लीलाविनोदरूपाने अनंत ब्रह्मांडांची उत्पत्ती व लयही करीत असते; पण आपण स्वतः मात्र आदिपुरुषाच्या ठिकाणी लपून राहते. (६)
जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे । जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी | ७|
हे प्रत्यक्ष दिसणारे विश्व हे तिचेच रूप आहे असे भासते, पण तिचा शोध घेऊ गेले असता ती कोठेच सापडत नाही. अशी ती विलक्षण असल्याने ब्रह्मादी देवांनाही तिचा अंत लागत नाही. (७)
जे सर्व नाटक अंतर्कळा । जाणीव स्फूर्ती निर्मळा । जयेचेनी स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती | ८|
या सर्व विश्वरूपी नाटकाची तीच मुख्य सूत्रधार असून ईश्वराच्या ठिकाणी प्रथम स्फुरलेली निर्मल 'एकोऽहं' ही जाणीव हे तिचेच स्वरूप आहे. तीच साधकांच्या ठिकाणी ज्ञानशक्तिरूपाने प्रगट होऊन त्यांना स्वानंदाची अनुभूती करून देते. (८)
जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा । जे शब्दीं वदोनि उभा । संसार नासी | ९|
जगातील सर्व लवण्याचे, सौंदर्याचे, शोभेचे ती उत्पत्तिस्थान असून, परब्रह्मरूपी सूर्याची प्रभा म्हणजे अभिन्न तेजही तीच आहे. आपल्या अचिंत्य अशा शब्दशक्तीच्या साहाय्याने ही विश्वाभासरूपी संसार नाहीसा करून टाकते. (९)
जे मोक्षश्रिया माहांमंगळा । जे सत्रावी जीवनकळा । हे सत्त्वलीळा सुसीतळा । लावण्यखाणी | १०|
तीच साक्षात मोक्षरूपी लक्ष्मी असून अत्यंत मंगलमय अशी सत्रावी जीवनकळा आहे. लावण्याची खाण अशी ही शारदा परम सुशीतल व सत्त्वशील असून जीवास सुख देणारी आहे. (१०)
जे अवेक्त पुरुषाची वेक्ती । विस्तारें वाढली इच्छाशक्ती । जे कळीकाळाची नियंती । सद्गु रुकृपा | १
अव्यक्त अशा परब्रह्माची व्यक्त झालेली शक्ती त्याच्या इच्छाशक्तीच्या साहाय्याने अत्यंत विस्तार पावली आहे. कळिकाळावरही सत्ता गाजविणाऱ्या सद्गुरुकृपेच्या रूपाने ती कार्यान्वित होते. (११)
जे परमार्थमार्गींचा विचार- । निवडून, दावी सारासार । भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें | १२|
तीच सारासार विवेकरूपाने परमार्थमार्गात मार्गदर्शन करून शब्दांच्या आधारे भवसिंधूतून पैलतीरास पोहोचविते. (१२)
ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली । सिद्धचि अंतरी संचली । चतुर्विधा प्रकारें | १
अशाप्रकारे विविध वेषांनी ती नटलेली दिसली, तरी ती शारदा मायारूपाने एकच असून सिद्धपुरुषांच्या ठिकाणी ती परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणींच्या रूपाने वास्तव्य करून असते. (१३)
तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें । म्हणौन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें | १
परा, पश्यंती, मध्यमा यांच्यात जे स्फुरते, तेच वैखरी वाणीने प्रगट केले जाते. म्हणून हे सर्व कर्तृत्व शारदेच्या योगेच प्रगट होत असते, हे जाणून घ्यावे. (१४)

जे ब्रह्मादिकांची जननी । हरीहर जयेपासुनी । सृष्टिरचना लोक तिनी । विस्तार जयेचा | १
अशी ही मूळमाया ब्रह्मादिकांची जननी असून तिच्यापासूनच विष्णू शंकरादी देव व तिन्ही लोकांची सृष्टिरचना होत असते. हा सर्व तिचाच विस्तार आहे. (१५)
जे परमार्थाचें मूळ । नांतरी सद्विद्याची केवळ । निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती | १६|
जिला सद्‌विद्या असे म्हणतात, जी निर्मळ, निश्चळ निवांत (शांतिरूप) परमार्थाचे मूळच अशी स्वरूपस्थिती, ती म्हणजे शारदाच होय. (१६)
जे योगियांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं । जे सिद्धांचे अंतःकर्णीं । समाधिरूपें | १७|
योग्यांच्या ठिकाणी ध्यानमग्नतेच्या रूपाने, साधकांच्या ठिकाणी आत्मस्वरूपचिंतनाच्या रूपाने तर सिद्धांच्या अंतःकरणात समाधिरूपाने तीच राहते. (१७)
जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण । जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वांघटीं | १८|
ती चराचरांत संपूर्णपणे व्यापक असून साधकांना स्वरूपाच्या अनुभवाच्या योगे तीच निर्गुणाचा परिचय करून देते. (१८)
शास्त्रें पुराणें वेद श्रुति । अखंड जयेचें स्तवन करिती । नाना रूपीं जयेसी स्तविती । प्राणीमात्र | १९|
शास्त्रे, पुराणे, वेद, श्रुती अखंड तिचीच स्तुती करत असतात व सर्व प्राणिमात्रही नाना रूपाने तिचेच गुणगान करतात. (१९)
जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरोपमाची उपमा । जयेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे | २०|
वेदशास्त्रांना मोठेपणा शारदेमुळेच प्राप्त झाला असून ज्या परमात्म्याचे शब्दांत वर्णन होऊच शकत नाही, त्याचे उपमा-दृष्टांताच्या सहाय्याने वर्णन करून त्यास 'परमात्मा' हे नाव देणारी ही शारदाच आहे. (२०)
नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी । जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञेप्तीमात्र | २
परमात्मस्वरूपाच्या ठिकाणी केवळ जाणीवरूपाने स्फुरणारी सूक्ष्म शुद्ध जाणीव हेच शारदेचे मूळरूप असून तीच नंतर नाना विद्या, नाना कला, नाना सिद्धी व नाना मतांसंबंधीच्या निश्चयात्मक बुद्धीच्या रूपाने प्रगट होत असते. (२१)
जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतरनिष्ठांची अंतरस्तिथी । जे जीवन्मुक्तांची मुक्ती । सायोज्यता ते | २२|
तीच हरिभक्तांच्या ठिकाणी निजभक्तीच्या रूपाने, अंतर्निष्ठांच्या ठिकाणी अंतर्यामी ज्ञाननिष्ठेच्या रूपाने तर जीवन्मुक्तांच्या ठिकाणी मुक्तिरूपाने वास करते व सायुज्यमुक्ती हेही तिचेच रूप आहे. (२२)
जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी । जे थोराथोरासी गोवी । जाणपणें | २
शारदा म्हणजे भगवंताची अनंत अशी मायाशक्ती असून ती अत्यंत लाघवी व नाट्यकलेत निपुण आहे. मोठमोठ्यांना 'मी ज्ञाता' या अभिमानाच्या जाणिवेत, मोहात ती गुंतविते. (२३)

जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें वोळखिलें । जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें | २
जे जे काही दृष्टीस दिसते, नादरूपाने ऐकू येते वा जे जे मनाने कल्पिले जाते अर्थात जेथपर्यंत इंद्रियांची, मनाची धाव पोहोचते, ते सर्व मायेचे रूप समजावे. (२४)
स्तवन भजन भक्ति भाव । मायेंवाचून नाहीं ठाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती | २
अर्थात आपण जे जे काही स्तवन, भजन, साधन, भक्तिभाव इत्यादी करतो, तेही मायेचेच स्वरूप असून मायेखेरीज तेथे इतर काही नाही. या बोलण्यातील गूढार्थ जे स्वस्वरूपाचे अनुभवी लोक असतील तेच जाणू शकतील. (२५)
म्हणौनी थोराहुनि थोर । जे ईश्वराचा ईश्वर । तयेसी माझा नमस्कार । तदांशेंचि आतां | २६|
म्हणून शेवटी थोराहूनही थोर व ईश्वराचाही ईश्वर असणाऱ्या त्या शारदेला तिच्या अंशरूपानेच मी आता नमस्कार करतो. (२६)
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
शारदास्तवननाम समास तिसरा |
इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे 'शारदास्तवननाम' समास तिसरा समाप्त

दासबोध दशक पहिला – समास चवथा : सद्‌गुरुस्तवन
| श्रीराम |
आतां सद्‌गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना । तें स्वरूप मज अज्ञाना । काये कळे |
मला सद्‌गुरूंचे स्तवन करावे अशी इच्छा तर आहे, पण ज्यांच्यापर्यंत माया पोहोचू शकत नाही, अशा त्या स्वरूपाचे आकलन माझ्यासारख्या अज्ञानी जीवास कसे होणार ? म्हणून सद्‌गुरूचे वर्णन करताच येत नाही, असे म्हणावे लागत आहे. (१)
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती । तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें | २|
श्रुती ही आत्मविद्येची जननी असून ती सुद्धा 'नेति नेति' मला कळत नाही, कळत नाही असे ज्याच्याविषयी म्हणते, त्या स्वरूपाचे वर्णन करण्यास माझ्यासारख्या मूर्खाची बुद्धी कशी समर्थ असेल ? (२)
मज न कळे हा विचारु । दुर्हूनि माझा नमस्कारु । गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज |
तुमचे वर्णन कसे करावे हेच मला कळत नसल्याने मी तुम्हांला दुरूनच नमस्कार करून प्रार्थना करतो की, हे गुरुदेवा, मला पैलतीरास न्या. (३)
होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा । असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी |
मायेच्या आधारे तुमचे स्तवन करता येईल अशी अयोग्य आशा मी मनाशी बाळगली होती, पण माया आपणास स्पर्शच करू शकत नसल्याने आता मायेचा आधारही नाहीसा झाला आहे. म्हणून 'हे सद्‌गुरू स्वामी, तुम्ही असाल तसे असा' एवढेच मी म्हणतो. (४)

मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन । माया जाली लज्यायमान । काय करूं |
मायेच्या साहाय्याने आपले स्तवन करावे अशी इच्छा माझ्या मनात होती. पण मायाच लाजून बाजूस सरल्यावर मी तरी काय करू ? (५)
नातुडे मुख्य परमात्मा । म्हणौनी करावी लागे प्रतिमा । तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरूचा | ६|
मुख्य परमात्मा इंद्रियगोचर नसल्याने तो हाती गवसत नाही, म्हणून त्याची प्रतिमा करून तिचा आधार घ्यावा लागतो. म्हणून आता त्या मायेचा आधार घेऊनच मी सद्गुरूचा महिमा वर्णन करीन. (६)
आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं । तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं | ७|
आपल्या मनात जसा भाव असेल त्यास अनुसरूनच ध्यानात मनाने आपल्या इष्ट देवाचे स्मरण करावे लागते. तशी माझ्या मनात जशी सद्गुरूची मूर्ती स्थिरावली आहे, तशीच ती आठवून त्या श्रीसद्गुरूचे मी स्तवन करतो. (७)
जय जया जि सद्गुखरुराजा । विश्वंभरा बिश्वबीजा । परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु | ८|
हे सद्गुरुराजा, तुझा जयजयकार असो | तूच सर्व विश्वास व्यापले आहेस, तूच विश्वाचे मूळ कारण आहेस व तूच परमपुरुष आहेस; तसेच मोक्ष देणारा व दीनांचा बंधू तूच आहेस. (८)
तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे । जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये | ९|
जसा सूर्यप्रकाशाने अंधार पळून जातो, तशी तुझी कृपा झाली की अनावर अशी मायाही ओसरू लागते. (९)
आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे । नीसी जालियां नंतरें । पुन्हां काळोखें | १०|
सूर्याच्या योगे अंधकार नाहीसा झाला, तरी रात्र झाली की परत काळोखाने ब्रह्मांड भरून जाते. (१०)
तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव । समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी | १
पण सद्गुरू स्वामीराज तसे नाहीत. ते अज्ञानाचा समूळ नाश करतात व त्यामुळे परत जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडावे लागत नाही. (११)
सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं । तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा | १२|
परीसस्पर्शाने लोखंडाचे एकदा सोने झाले की, ते परत लोखंड कधीच होत नाही. त्याप्रमाणे गुरूंनी आपल्या दासाचे अज्ञान एकदा समूळ नष्ट केले की, तो परत कधीही संशयात पडत नाही. (१२)
कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा | १
किंवा नदी एकदा गंगेस मिळाली की त्यासरशी ती गंगाच बनते. मग कितीही प्रयत्न केले तरी ती कधीही वेगळी केली जाऊ शकतच नाही. (१३)
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें । तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये | १
एखाद्या ओहोळाला नदीला मिळण्यापूर्वी जग लहान ओढाच म्हणते. पण नदीला मिळाल्यावर तो

नदी होतो. तसा सामान्य साधक सद्‌गुरुकृपा होण्यापूर्वी कसाही असला तरी सद्‌गुरुकृपा झाली की तो तत्काळ गुरूच होतो. (१४)

परीस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना । उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा | १

परीस लोखंडाचे सोने करतो पण त्या सुवर्णास तो आपले परिसत्व देत नाही म्हणजे त्या सोन्याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होऊ शकत नाही. पण जो साधक सद्‌गुरूचा कृपांकित होतो, तोही अनेक लोकांचा उद्धार करू शकतो. (१५)

शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां न ये । म्हणौनी उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची | १६|

परिसामुळे सुवर्ण झालेल्या सुवर्णाच्या स्पर्शाने दुसऱ्या लोखंडाचे सोने होऊ शकत नाही, पण सद्‌गुरुकृपेने शिष्यास मात्र गुरुत्वच प्राप्त होते; म्हणून सद्‌गुरूंना परिसाची उपमा देणेही योग्य नाही. (१६)

उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतची क्षार । अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं | १७|

बरे त्यांना सागराची उपमा द्यावी तर तो तर अत्यंत खारट असतो म्हणून तीही उपमा योग्य नव्हे. अथवा क्षीरसागराची उपमा द्यावी तर कल्पांती क्षीरसागरही नष्ट होतो. म्हणून तीही उपमा देता येत नाही. (१७)

उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु । तैसा नव्हे कीं सद्गुरु । कोमळ दिनाचा | १८|

सद्‌गुरूंना मेरू पर्वताची उपमा द्यावी तर मेरुपर्वत जड पाषाणाचा व कठोर आणि सद्‌गुरू तर दीन शरणागताविषयी अत्यंत कोमल अंतःकरणाचे असतात, म्हणून तीही उपमा देता येत नाही. (१८)

उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण । या कारणें दृष्टांत हीण । सदगुरूस गगनाचा | १९|

बरे | सद्‌गुरूंना गगनाची उपमा द्यावी, तर त्यांचे रूप गगनाच्याही पलीकडचे निर्गुण आहे. म्हणून गगनाची उपमासुद्धा हीन ठरते. (१९)

धीरपणे । म् उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं । म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा | २०|

धैर्यशील म्हणून पृथ्वीची उपमा द्यावी तर कल्पांती पृथ्वीही खचून जाईल. म्हणून तिची उपमाही अयोग्य ठरते. (२०)

उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती । शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुचरु अमर्याद | २

सद्‌गुरू परम प्रकाशरूप म्हणून सूर्याची उपमा द्यावी तर त्यालाही मर्यादा आहे. पण सद्‌गुरूचे सामर्थ्य अमर्याद आहे. ते नित्य परम प्रकाशरूपच आहेत. (२१)

म्हणौनी उपमे उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर । उपमावा फणीवर । तरी तोहि भारवाही | २२|

सदगुरूंचा प्रकाश चिरंतन टिकणारा असल्याने त्याला सूर्याची उपमा देताच येत नाही. बरे शेषाची

उपमा द्यावी तर त्याने स्वतःच पृथ्वीचा भार आपल्या मस्तकावर वाहिला आहे. परंतु श्रीगुरू शिष्याचा संसारभार दूर करतात. म्हणून तीही उपमा देता येत नाही. (२२)

उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ । सद्गुरुस्वरूप तें निश्चळ । जाणार नाहीं | २

आता जीवनदायी व कोमल म्हणून जलाची उपमा द्यावी, तर कालांतराने पाणीही आटून जाते. शिवाय ते चंचल असते, पण सद्गुरु-स्वरूप निश्चल असून त्याचा नाश कधीच होत नाही. (२३)

सद्गु रूसी उपमावे । म् अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ । सद्गुररुकृपा यथार्थ । अमर करी | २

त्यांना अमृताची उपमा द्यावी तर सदैव अमृतपान करणारे देवही मृत्यूच्या कचाट्यातून सुटत नाहीत. पण एकदा सद्गुरूची कृपा झाली की, शिष्य मात्र अमर होतो. म्हणून ही उपमाही देता येत नाही. (२४)

सद्गुररूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु ।स्व कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी | २

सद्गुरूला कल्पतरूची उपमाही देता येत नाही. कारण तो जे मागावे तेवढेच व तेही कल्पनेतील पदार्थच देतो. पण सद्गुरू कल्पनेच्या पलीकडील मोक्ष देतात. मग कल्पतरूचा अंगीकार कोण करील बरे | (२५)

चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी । कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती | २६|

सदगुरूंना चिंतामणीची उपमाही देता येत नाही. कारण ते शिष्याच्या मनात कुठलीही चिंताच उरू देत नाहीत. त्यांच्या कृपेने शिष्य निष्काम झालेला असतो. मग निष्काम झालेल्या पुरुषास कामधेनूची प्रसन्नता वा पान्हा यांची आवश्यकताच उरत नाही. म्हणून चिंतामणी वा कामधेनू यांच्याही उपमा सद्गुरूना देता येत नाहीत. (२६)

सद्गुरु म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत । ज्याचे द्वारीं असे तिष्टत । मोक्षलक्ष्मी | २७|

सद्गुरूंना लक्ष्मीवंत म्हणावे, तर तेही योग्य नव्हे कारण लक्ष्मी चंचल असते, नाशिवंत असते, पण सद्गुरूंच्या दारी तर साक्षात मोक्षलक्ष्मी त्यांच्या कृपाकटाक्षाची आशा धरून तिष्ठत असते. म्हणून ही उपमाही देता येत नाही. (२७)

स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरीं विटंबती । सद्गुतरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना | २८|

स्वर्गलोक, इंद्रपद या सर्व गोष्टी नश्वर असून कालांतराने नाश पावतात. पण सद्गुरूची कृपा एकदा झाली की ती कधीही नाश पावत नाही. (२८)

हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक । सर्वदा अविनाश येक । सद्गुवरुपद | २९|

ब्रह्मा, विष्णू शिवादी सर्व देव हे कालांतराने नाश पावतात. एक सद्गुरुपदच असे आहे की ते अविनाशी आहे. (२९)

तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी । पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें | ३०|

फार काय सांगावे, ही सर्व सृष्टीच पंचमहाभूतांची असून नाशिवंत आहे. फक्त सद्गुरूचे स्वरूपच शाश्वत अविनाशी आहे. तेव्हां त्याची उठाठेव करण्यातही काही अर्थ नाही. (३०)

म्हणौनी सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना । अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती | ३
तेव्हा सद्गुरूंच्या रूपाचे वर्णन करता येण्यासारखे नाही, हेच माझे वर्णन आहे. जे अंतरीच्या खुणा जाणणारे असतात, त्यांनाच त्यांचे खरे स्वरूप कळते. (३१)

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सद्गुरुस्तवननाम समास चवथा |
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सद्गुरुस्तवननाम ' समास चौथा समाप्त.

दासबोध दशक पहिला – समास पांचवा : संतस्तवन
| श्रीराम |
आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान । जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं |
आता परमार्थाचे जे मुख्य आश्रयस्थान, की ज्यांच्यामुळेच अत्यंत गुह्य असे आत्मज्ञान या जगात प्रकट होते, त्या सज्जनांना मी वंदन करतो. (१)
जे वस्तु परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ । तेंचि होये सुल्लभ । संतसंगेकरूनी | २|
परब्रह्मप्राप्ती अत्यंत श्रेष्ठ प्रतीची लाभदायक गोष्ट आहे. पण तिची प्राप्ती होणे मात्र अत्यंत दुर्लभ आहे. हा अलभ्य लाभ प्राप्त करून घेण्याचा सर्वांत सोपा उपाय म्हणजे संतसंगती. (२)
वस्तु प्रगटचि असे । पाहातां कोणासीच न दिसे । नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं |
परब्रह्म वास्तविक प्रगटच आहे. पण अनेक साधनांचे कष्ट करूनही त्याची प्राप्ती सहसा होऊ शकत नाही. कारण त्याचा शोध घेऊ गेले असता ते कुठे आढळूनच येत नाही. (३)
जेथें परिक्षवंत ठकले । नांतरी डोळसचि अंध जाले । पाहात असताअंचि चुकले । निजवस्तूसी |
अनेक वस्तूंची यथायोग्य पारख करणारे परीक्षावंत येथे मात्र फसतात. डोळसांनाही आत्मवस्तु दिसत नाही. तेही चुकतात, म्हणजेच डोळे असूनही आंधळे ठरतात. (४)
हें दीपाचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना । नेत्रांजनेंहि वसेना । दृष्टीपुढें |
दिव्याच्या प्रकाशाने किंवा इतरही नाना प्रकारच्या प्रकाशाने आत्मवस्तु दिसत नाही. एवढेच नव्हे तर डोळ्यांत नेत्रांजन घालून ती पाहण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धा ती दृष्टीपुढे येत नाही. (५)
सोळां कळी पूर्ण शशी । दाखवू शकेना वस्तूसी । तीव्र आदित्य कळारासी । तोहि दाखवीना | ६|
सोळा कलांनी परिपूर्ण असा पौर्णिमेचा चंद्रसुद्धा ती दाखविण्यास समर्थ नाही. एवढेच नव्हे तर अत्यंत तीव्र प्रकाशाने तळपणारा तेजोनिधी असा सूर्यही आत्मवस्तूस दाखवू शकत नाही. (६)
जया सुर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतु तोहि दिसे । नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक | ७|
कोळ्याच्या अंगांतून बाहेर पडणारा अति सूक्ष्म तंतू सूर्यप्रकाशामुळे दिसू शकतो, तसेच अणुरेणू इत्यादी सूक्ष्म असे पदार्थही सूर्यप्रकाशाच्या योगे आपण पाहू शकतो. (७)

चिरलें वाळाग्र तेंहि प्रकासी । परी तो दाखवीना वस्तूसी । तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये | ८|
एवढेच कशाला, केसाच्या अग्राचे चिरलेले टोकही सूर्यप्रकाशाने दिसू शकते, पण असा सूर्यही आत्मवस्तूस प्रकाशित करू शकत नाही, पण अशा दुर्लभ आत्मवस्तूची प्राप्ती साधकांना संतांच्या कृपेने मात्र होऊ शकते. (८)
जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले । जेथें तर्क मंदावले । तर्कितां निजवस्तूसी ।
आत्मवस्तूचे स्वरूप असे विलक्षण आहे की, तेथे सर्व आक्षेप निरुपयोगी होतात. प्रयत्न उपयोगी पडत नाहीत, तर्काने ती जाणण्याचा प्रयत्न केल्यास तेथे तर्कही मंदावतात. (९)
वळे विवेकाची वेगडी । पडे शब्दाची बोबडी । जेथें मनाची तांतडी । कामा नये | १०|
विवेकाने तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास विवेक पांगुळतो, शब्दांनी जाणण्याचा प्रयत्न करू जावे तर शब्दांचीच बोबडी वळते व मनाने जाणू जावे, तर तेथे मनाची धडपड उपयोगी पडत नाही. (१०)
जो बोलकेपणें विशेष । सहस्त्र मुखांचा जो शेष । तोहि सिणला निःशेष । वस्तु न संगवे | १
शेषास सहस्त्र मुखे असल्यामुळे वक्त्यांमध्ये तो विशेष प्रसिद्ध आहे, पण तोही वर्णन करून थकला, तरी त्याला निजवस्तूचे वर्णन करता आले नाही. (११)
वेदे प्रकाशिलें सर्वही । वेदविरहित कांहीं नाहीं । तो वेद कोणासही । दाखवूं सकेना | १२|
वेदांत सर्व वस्तूंचे वर्णन आढळते. त्यांत ज्या वस्तूचे वर्णन नाही अशी वस्तूच नाही असे म्हटले जाते; पण तो वेदही कुणालाही आत्मवस्तु दाखवू शकत नाही. (१२)
तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे । त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु | १
अशी सर्वप्रकारे अत्यंत दुर्लभ जी आत्मवस्तु ती ज्या संतांच्या संगतीने स्वानुभवाच्या योगे जाणली जाऊ शकते, त्या संतांचा महिमा कुणालाही शब्दांत कसा बरे वर्णन करता येईल ? (१३)
विचित्र कळा ये मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची । मायातीता अनंताची । संत सोये सांगती | १
मायेचे अंगी अनेक विचित्र कळा असल्या, तरी तीही त्या आत्मवस्तूचा परिचय करून देण्यास असमर्थ आहे. अशा त्या मायातीत परब्रह्माची प्राप्ती कशी होईल, त्याचा सोपा उपाय केवळ संतच सांगू शकतात. (१४)
वस्तूसी वर्णिलें नवचे । तेंचि स्वरूप संतांचें । या कारणे वचनाचें । कार्य नाही | १
ज्याप्रमाणे आत्मवस्तूचे वर्णन करता येत नाही, त्याप्रमाणेच संतांच्या स्वरूपाचेही वर्णन करता येत नाही. कारण ते शब्दातीत असल्याने ते शब्दांच्या आटोक्यात येत नाही. (१५)
संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषाचें मूळ । ते हे संत | १६|
संत हे परमानंदरूप असतात, सुखरूप असतात. एवढेच नव्हे, तर नाना संतोषाची उत्पत्ती त्यांच्यापासूनच होते. (१६)
संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती । नांतरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत | १७|
संत हे विश्रांतीची विश्रांती, तृप्तीची निजतृप्ती अथवा भक्तीची फलश्रुती असतात. (१७)

संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र । नांतरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी | १८|
संत हे धर्माचे निवासस्थान असतात. स्वस्वरूपाची साठवण करण्यास योग्य असे सत्पात्र असतात; अथवा जेथे पुण्यच उदयास येते, अशी पवित्र पुण्यभूमी म्हणजे संतच होय. (१८)
संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार । नांतरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें | १९|
संत म्हणजे समाधीचे मंदिरच, विवेकाचे भांडारच आणि सायुज्य मुक्तीचे माहेरघरच असतात. (१९)
संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो । संतप्राप्तीचा समयो । सिद्धरूप | २०|
संत सत्याचा कधीही त्याग करीत नाहीत. संतांचे जीवन म्हणजे कृतार्थ जीवनाचा आदर्शच असतो ज्यावेळी आत्मवस्तुप्राप्तीची वेळ येते, त्या सिद्ध समयीच संतांची भेट होते. (२०)
मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले | २
संतांजवळ मोक्षलक्ष्मी तिष्ठत उभी असते. या शाश्वत संपत्तीने ते वैभवसंपन्न असतात. एवढेच नव्हे, तर असंख्य दरिद्री जीवांना मोक्षलक्ष्मी देऊन त्यांना ते राजाप्रमाणे वैभवसंपन्न करून सोडतात. (२१)
जे समर्थपणें उदार । जे कां अत्यंत दानशूर । तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वचे | २२|
संत अत्यंत सामर्थ्यसंपन्न व उदारवृत्तीचे असतात. ते दानशूर असल्याने लोकांचे दुःख पाहून त्यांना ज्ञानाचा विचार सांगितल्याशिवाय ते कसे राहू शकतील ? (२२)
माहांराजे चक्रवर्ती । जाले आहेत पुढें होती । परंतु कोणी सायोज्यमुक्ती । देणार नाहीं | २
जगात आजपर्यंत पुष्कळ चक्रवर्ती सम्राट झाले आहेत. सध्या आहेत व पुढेही होतील, पण त्यातील कोणीही सायुज्यमुक्ती देऊ शकत नाहीत. (२३)
जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन । तयां संतांचें महिमान । काय म्हणौनी वर्णावें | २
हे सायुज्यमुक्तीचे दान त्रैलोक्यात संतसज्जनांशिवाय कुणी देऊच शकत नाही. ते सहज देणाऱ्या संतांची थोरवी कोणत्या बरे शब्दांनी वर्णन करावी ? (२४)
जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळे । तेंचि जयांचेनि वोळे । परब्रह्म अंतरीं | २
जे परब्रह्म या त्रैलोक्याहून वेगळे आहे, जे वेद व श्रुतींनाही जाणता येत नाही, असे परब्रह्म संतांच्या कृपेनेच साधकाच्या अंतःकरणात प्रगट होते. (२५)
ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा । जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये | २६|
असा हा संतांचा महिमा अगाध असल्याने तो वर्णन करण्यास कितीही उपमा दिल्या, तरी त्या अपुऱ्याच पडतात. संतांच्या मुळेच मुख्य परमात्मा प्रगट होतो. (२६)
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
संतस्तवननाम समास पांचवा |
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'संतस्तवननाम' समास पाचवा समाप्त

मनाचे श्लोक (श्री रामदास स्वामी कृत)

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा|
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।
गमूं पंथ आनंत या राघवाचा|

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें|
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे |२|

प्रभाते मनी राम चिंतीत जावा।
पुढे वैखरी राम आधी वदावा|
सदाचार हा थोर सांडूं नये तो।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो |३|

मना वासना दुष्ट कामा न ये रे।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे|
मना धर्मता नीति सोडूं नको हो।
मना अंतरीं सार वीचार राहो |४|

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा|
मना कल्पना ते नको वीषयांची।
विकारे घडे हो जनी सर्व ची ची |५|

नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नाना विकारी|
नको रे मना लोभ हा अंगिकारू।
नको रे मना मत्सरु दंभ भारु |६|

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावें|
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसि रे नीववावें |७|

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी|
मना चंदनाचे परी त्वां झिजावे।
परी अंतरीं सज्जना नीववावे |८|

नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे।
अति स्वार्थबुद्धी नुरे पाप सांचे|
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे।
न होतां मनासारिखें दु:ख मोठे |९|

सदा सर्वदा प्रीती रामीं धरावी।
दु:खाची स्वयें सांडि जीवी करावी|
देहेदु:ख ते सूख मानीत जावे।
विवेके सदा स्वस्वरुपीं भरावें |१०|

जनीं सर्वसूखी असा कोण आहे।
विचारें मना तुंचि शोधुनि पाहे|
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले।
तयासारिखे भोगणें प्राप्त जाले |११|

मना मानसीं दु:ख आणूं नको रे।
मना सर्वथा शोक चिंता नको रे|
विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी|१२|

मना सांग पां रावणा काय जाले।
अकस्मात ते राज्य सर्वै बुडाले|
म्हणोनी कुडी वासना सांड वेगीं।
बळे लागला काळ हा पाठिलागी |१३|

जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला।
परी शेवटीं काळमूखीं निमाला|
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले।
कितीएक ते जन्मले आणि मेले |१४|

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी।
जितां बोलती सर्वही जीव मी मी|
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती |१५|

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।
अकस्मात तोही पुढे जात आहे|
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्याते।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेते |१६|

मनीं मानवा व्यर्थ चिंता वहाते।
अकस्मात होणार होऊनि जाते|
घडें भोगणे सर्वही कर्मयोगे।
मतीमंद तें खेद मानी वियोगें |१७|

मना राघवेंवीण आशा नको रे।
मना मानवाची नको कीर्ति तूं रे|
जया वर्णिती वेद-शास्त्रे-पुराणें।
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणे |१८|

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे।
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे|
मना सत्य ते सत्य वाचे वदावे।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें |१९|

बहू हिंपुटी होईजे मायपोटी।
नको रे मना यातना तेचि मोठी|
निरोधें पचे कोंडिले गर्भवासी।
अधोमूख रे दु:ख त्या बाळकासीं |२०|

मना वासना चूकवीं येरझारा।
मना कामना सांडी रे द्रव्यदारा|
मना यातना थोर हे गर्भवासीं।
मना सज्जना भेटवीं राघवासीं|२१|

मना सज्जना हीत माझें करावें।
रघुनायका दृढ चित्ती धरावें|
महाराज तो स्वामि वायुसुताचा।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा |२२|

न बोलें मना राघवेवीण कांहीं।
जनी वाउगें बोलता सुख नाहीं|
घडिने घडी काळ आयुष्य नेतो।
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो?|२३|

रघुनायकावीण वांया शिणावे।
जनासारिखे व्यर्थ कां वोसणावें|
सदा सर्वदा नाम वाचे वसो दे।
अहंता मनी पापिणी ते नसो दे|२४|

मना वीट मानूं नको बोलण्याचा।
पुढें मागुता राम जोडेल कैंचा|
सुखाची घडी लोटतां सूख आहे।
पुढें सर्व जाईल कांही न राहे |२५|

देहेरक्षणाकारणें यत्न केला।
परी शेवटीं काळ घेउन गेला|
करीं रे मना भक्ति या राघवाची।
पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची |२६|

भवाच्या भये काय भीतोस लंडी।
धरीं रे मना धीर धाकासि सांडी|
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी |२७|

दिनानाथ हा राम कोदंडधारी।
पुढें देखतां काळ पोटीं थरारी|
मना वाक्य नेमस्त हे सत्य मानीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी|२८|

पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे।
वळें भक्तरीपूशिरी कांबि वाजे|
पुरी वाहिली सर्व जेणे विमानीं।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी |२९|

समर्थाचिया सेचका वक्र पाहे।
असा सर्व भुमंडळी कोण आहे|
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३०|

महासंकटी सोडिले देव जेणें।
प्रतापे बळे आगळा सर्वगूणे|
जयाते स्मरे शैलजा शूलपाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३१|

अहल्या शिळा राघवें मुक्त केली।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली|
जया वर्णितां शीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३२|

वसे मेरुमांदार हे सृष्टिलीला ।
शशी सूर्य तारांगणे मेघमाला|
चिरंजीव केले जनी दास दोन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३३|

उपेक्षी कदा रामरुपी असेना।
जिवां मानवां निश्चयो तो वसेना|
शिरी भार वाहेन बोले पुराणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी|३४|

असे हो जया अंतरी भाव जैसा।
वसे हो तया अंतरी देव तैसा|
अनन्यास रक्षीतसे चापपाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३५|

सदा सर्वदा देव सन्नीध आहे।
कृपाळुपणे अल्प धारीष्ट पाहे|
सुखानंद आनंद कैवल्यदानी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३६|

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा।
उडी घालितो संकटी स्वामि तैसा|
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |३७|

मना प्रार्थना तूजला एक आहे।
रघूराज थक्कीत होऊनि पाहे|
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे |३८|

जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे।
जयाचेनि योगें समाधान बाणे|
तयालागिं हें सर्व चांचल्य दीजे।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे |३९|

मना पाविजे सर्वही सूख जेथे।
अति आदरें ठेविजे लक्ष तेथें|
विविकें कुडी कल्पना पालटिजे।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे |४०|

बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं।
शिणावे परी नातुडे हीत कांहीं|
विचारें बरें अंतरा बोधवीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे |४१|

बहुतांपरी हेंचि आतां धरावें।
रघूनायका आपुलेसे करावें|
दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे|४२|

मना सज्जना एक जीवीं धरावें।
जनी आपुलें हीत तूवां करावें|
रघूनायकावीण बोलो नको हो।
सदा मानसीं तो निजध्यास राहो |४३|

मना रे जनीं मौनमुद्रा धरावी।
कथा आदरे राघवाची करावी|
नसें राम ते धाम सोडूनि द्यावे।
सुखालागिं आरण्य सेवीत जावे |४४|

जयाचेनि संगे समाधान भंगे।
अहंता अकस्मात येऊनि लागे|
तये संगतीची जनीं कोण गोडी।
जिये संगतीनें मती राम सोडी |४५|

मना जे घडी राघवेवीण गेली।
जनीं आपुली ते तुवां हानि केली|
रघूनायकावीण तो शीण आहे।
जनी दक्ष तो लक्ष लावूनि पाहे |४६|

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे।
जनीं जाणतां मुक्त होऊनि राहे|
गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा |४७|

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा।
सदा रामनामें वदे नित्य साचा|
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा |४८|

सदा बोलण्यासारिखे चालताहे।
अनेकीं सदा एक देवासि पाहे|
सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा |४९|

नसे अंतरी काम नानाविकारी।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी|
निवाला मनीं लेश नाही तमाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५०|

मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी|
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५१|

क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे।
न लिंपे कदा दंभ वादे विवादे|
करी सुखसंवाद जो उगमाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५२|

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी|
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५३|

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी|
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५४|

नसे मानसीं नष्ट आशा दुराशा।
वसे अंतरीं प्रेमपाशा पिपाशा|
ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५५|

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू|
तया अंतरी क्रोध संताप कैंचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा |५६|

जगीं होइजे धन्य या रामनामे।
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमे|
उदासीनता तत्त्वता सार आहे।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे |५७|

नको वासना वीषयीं वृत्तिरुपें।
पदार्थी जडे कामना पूर्वपापें|
सदा राम निष्काम चिंतीत जावा।
मना कल्पनालेश तोहि नसावा |५८|

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी|
मनीं कामना राम नाही जयाला।
अती आदरे प्रीती नाही तयाला |५९|

मना राम कल्पतरु कामधेनु।
निधी सार चिंतामणी काय वानूं|
जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता।
तया साम्यता कायसी कोण आतां |६०|

उभा कल्पवृक्षातळीं दु:ख वाहे।
तया अंतरीं सर्वदा तेचि आहे|
जनी सज्जनी वाद हा वाढवावा।
पुढें मागता शोक जीवीं धरावा |६१|

निजध्यास तो सर्व तुटोनि गेला।
बळें अंतरीं शोक संताप ठेला|
सुखानंद आनंद भेदें बुडाला।
मना निश्चयो सर्व खेदे उडाला |६२|

घरी कामधेनू पुढें ताक मागें।
हरीबोध सांडोनि वेवाद लागे|
करी सार चिंतामणी काचखंडे।
तया मागतां देत आहे उदंडे |६३|

अती मूढ त्या दृढ बुद्धि असेना।
अती काम त्या राम चित्ती वसेना|
अती लोभ त्या क्षोभ होइल जाणा।
अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा|६४|

नको दैन्यवाणें जिणे भक्तिऊणे।
अती मुर्ख त्या सर्वदा दु:ख दूणे|
धरीं रे मना आदरें प्रीति रामी।
नको वासना हेमधामीं विरामीं|६५|

नव्हे सार संसार हा घोर आहे।
मना सज्जना सत्य शोधुनि पाहे|
जनीं वीष खातां पुढे सूख कैचे।
करीं रे मना ध्यान या राघवाचें |६६|

घनश्याम हा राम लावण्यरुपी।
महाधीर गंभीर पूर्णप्रतापी|
करी संकटीं सेवकांचा कुडावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |६७|

बळें आगळा राम कोदंडधारी।
महाकाळ विक्राळ तोही थरारी|
पुढे मानवा किंकरा कोण केवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |६८|

सुखानंदकारी निवारी भयातें।
जनीं भक्तिभावे भजावे तयातें|
विवेके त्यजावा अनाचार हेवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |६९|

सदा रामनामे वदा पुर्णकामें।
कदा बाधिजेना ऽऽ पदा नित्य नेमें|
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |७०|

जयाचेनि नामें महादोष जाती।
जयाचेनि नामें गती पाविजेती|
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा|७१|

न वेचे कदा ग्रंथचि अर्थ काही।
मुखे नाम उच्चारितां कष्ट नाहीं|
महाघोर संसारशत्रु जिणावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |७२|

देहेदंडणेचे महादु:ख आहे।
महादु:ख तें नाम घेता न राहे|
सदाशीव चिंतीतसे देवदेवा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा |७३|

बहुतांपरी संकटे साधनांची।
व्रते दान उद्यापने ती धनाची|
दिनाचा दयाळू मनी आठवावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |७४|

समस्तामधे सार साचार आहे।
कळेना तरी सर्व शोधुन पाहे|
जिवा संशयो वाउगा तो त्यजावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |७५|

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांही।
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं|
म्हणे दास विश्वास नामी धरावा।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा |७६।

करी काम निष्काम या राघवाचे।
करी रुप स्वरुप सर्वां जिवांचे |
करि छंद निर्द्वद्व हे गुण गातां।
हरीकीर्तनी वृत्तिविश्वास होतां |७७|

अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं।
तया पामरा बाधिजे सर्व कांही|
महाराज तो स्वामि कैवल्यदाता।
वृथा वाहणें देहसंसारचिंता |७८|

मना पावना भावना राघवाची।
धरी अंतरीं सोडिं चिंता भवाची|
भवाची जिवा मानवा भूलि ठेली।
नसे वस्तुचि धारणा व्यर्थ गेली |७९|

धरा श्रीवरा त्या हरा अंतराते।
तरा दुस्तरा त्या परा सागराते|
सरा वीसरा त्या भरा दुर्भराते।
करा नीकरा त्या खरा मत्सराते |८०|

मना मत्सरे नाम सांडूं नको हो।
अती आदरे हा निजध्यास राहो|
समस्तांमधे नाम हे सार आहे।
दुजी तूळणा तूळितांही न साहे |८१|

बहु नाम या रामनामी तुळेना।
अभाग्या नरा पामरा हे कळेंना|
विषा औषधा घेतले पार्वतीशे।
जिवा मानवा किंकरा कोण पुसे |८२|

जेणे जाळिला काम तो राम ध्यातो।
उमेसी अती आदरें गूण गातो|
बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें।
परी अंतरी नामविश्वास तेथें |८३|

विठोने शिरी वाहिला देवराणा।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा|
निवाला स्वये तापसी चंद्रमौळी।
जिवा सोडवी राम हा अंतकाळीं |८४|

भजा राम विश्राम योगेश्वरांचा।
जपू नेमिला नेम गौरीहराचा|
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी।
तुम्हां सोडवी राम हा अंतकाळीं |८५|

मुखी राम विश्राम तेथेचि आहे।
सदानंद आनंद सेवोनि आहे|
तयावीण तो शीण संदेहकारी।
निजधाम हे नाम शोकापहारी|८६|

मुखी राम त्या काम बाधुं शकेना।
गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना|
हरीभक्त तो शक्त कामास भारी।
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी |८७|

बहू चांगले नाम या राघवाचे।
अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे|
करी मूळ निर्मूळ घेता भवाचे।
जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें |८८|

जनीं भोजनी नाम वाचे वदावें।
अती आदरे गद्यघोषे म्हणावे|
हरीचिंतने अन्न सेवीत जावे।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें |८९|

न ये राम वाणी तया थोर हाणी।
जनीं व्यर्थ प्राणी तया नाम कोणी|
हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं।
बहू आगळे बोलिली व्यासवाणी |९०|

नको वीट मानूं रघुनायकाचा।
अती आदरे बोलिजे राम वाचा|
न वेंचे मुखी सांपडे रे फुकाचा।
करीं घोष त्या जानकीवल्लभाचा |९१|

अती आदरें सर्वही नामघोषे।
गिरीकंदरी जाइजे दूरि दोषें|
हरी तिष्ठतू तोषला नामघोषें।
विशेषें हरामानसीं रामपीसें |९२|

जगीं पाहतां देव हा अन्नदाता।
तया लागली तत्त्वता सार चिंता|
तयाचे मुखी नाम घेता फुकाचे।
मना सांग पां रे तुझे काय वेंचे |९३|

तिन्ही लोक जाळुं शके कोप येतां।
निवाला हरु तो मुखे नाम घेतां|
जपे आदरें पार्वती विश्वमाता।
म्हणोनी म्हणा तेंचि हे नाम आतां |९४|

अजामेळ पापी वदे पुत्रकामे।
तया मुक्ति नारायणाचेनि नामें|
शुकाकारणे कुंटणी राम वाणी।
मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं |९५|

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं।
जपे रामनामावळी नित्यकाळीं|
पिता पापरुपी तया देखवेना।
जनी दैत्य तो नाम मुखे म्हणेना |९६|

मुखी नाम नाहीं तया मुक्ति कैंची।
अहंतागुणे यातना ते फुकाची|
पुढे अंत येईल तो दैन्यवाणा।
म्हणोनि म्हणा रे म्हणा देवराणा |९७|

हरीनाम नेमस्त पाषाण तारी।
बहु तारीले मानवी देहधारी|
तया रामनामीं सदा जो विकल्पी।
वदेना कदा जीव तो पापरूपी |९८|

जगीं धन्य वाराणसी पुण्यराशी।
तयेमाजि आतां गतीं पूर्वजांसी|
मुखे रामनामावळी नित्य काळीं।
जिवा हित सांगे सदा चंद्रमौळी |९९|

यथासांग रे कर्म तेंहि घडेना।
घडे धर्म तें पुण्य गांठी पडेना|
दया पाहतां सर्व भुतीं असेना।
फुकाचे मुखी नाम तेंही वसेना |१००|

जया नावडे नाम त्या यम जाची।
विकल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची|
म्हणोनि अती आदरे नाम घ्यावे।
मुखे बोलतां दोष जाती स्वभावें |१०१|

अती लीनता सर्वभावे स्वभावें।
जना सज्जनालागिं संतोषवावे|
देहे कारणीं सर्व लावीत जावें।
सगूणीं अती आदरेसी भजावें |१०२|

हरीकीर्तनीं प्रीति रामीं धरावी।
देहेबुद्धि नीरूपणीं वीसरावी|
परद्रव्य आणीक कांता परावी।
यदर्थीं मना सांडि जीवीं करावी |१०३|

क्रियेवीण नानापरी बोलिजेंते।
परी चित्त दुश्चीत तें लाजवीतें|
मना कल्पना धीट सैराट धांवे।
तया मानवा देव कैसेनि पावे |१०४|

विवेके क्रिया आपुली पालटावी।
अती आदरे शुद्ध क्रीया धरावी|
जनीं बोलण्यासारिखे चाल बापा।
मना कल्पना सोडिं संसारतापा |१०५|

बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा।
विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा|
दया सर्वभुतीं जया मानवाला।
सदा प्रेमळू भक्तिभावे निवाला |१०६|

मना कोपआरोपणा ते नसावी।
मना बुद्धि हे साधुसंगी वसावी|
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं।
मना होइ रे मोक्षभागी विभागी |१०७|

मना सर्वदा सज्जनाचेनि योगें।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे|
क्रियेवीण वाचाळता ते निवारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी |१०८|

जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा।
जनीं वादसंवाद सूखे करावा|
जगीं तोचि तो शोकसंतापहारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी |१०९|

तुटे वाद संवाद त्याते म्हणावें।
विवेके अहंभाव यातें जिणावें|
अहंतागुणे वाद नाना विकारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी|११०|

हिताकारणे बोलणे सत्य आहे।
हिताकारणे सर्व शोधुनि पाहें|
हितकारणे बंड पाखांड वारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी |१११|

जनीं सांगतां ऐकता जन्म गेला।
परी वादवेवाद तैसाचि ठेला|
उठे संशयो वाद हा दंभधारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी|११२|

जनी हीत पंडीत सांडीत गेले।
अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले|
तयाहून व्युत्पन्न तो कोण आहे।
मना सर्व जाणीव सांडुनि राहे|११३|

फुकाचे मुखी बोलतां काय वेचे।
दिसंदीस अभ्यंतरी गर्व सांचे|
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे।
विचारे तुझा तूंचि शोधुनि पाहे |११४|

तुटे वाद संवाद तेथें करावा।
विविके अहंभाव हा पालटावा|
जनीं बोलण्यासारिखे आचरावें।
क्रियापालटे भक्तिपंथेचि जावे |११५|

बहू शापिता कष्टला अंबऋषी।
तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी|
दिला क्षीरसिंधु तया ऊपमानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी|११६|

धुरू लेकरु बापुडे दैन्यवाणे।
कृपा भाकितां दीधली भेटी जेणे|
चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |११७|

गजेंदु महासंकटी वास पाहे।
तयाकारणे श्रीहरी धांवताहे|
उडी घातली जाहला जीवदानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |११८|

अजामेळ पापी तया अंत आला।
कृपाळूपणे तो जनीं मुक्त केला|
अनाथासि आधार हा चक्रपाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |११९|

विधीकारणे जाहला मत्स्य वेगीं।
धरी कूर्मरुपे धरा पृष्ठभागी।
जना रक्षणाकारणे नीच योनी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |१२०|

महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला।
म्हणोनी तयाकारणे सिंह जाला|
न ये ज्वाळ वीशाळ संनधि कोणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |१२१|

कृपा भाकिता जाहला वज्रपाणी।
तया कारणें वामनू चक्रपाणी|
द्विजांकारणे भार्गवू चापपाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |१२२|

अहल्येसतीलागी आरण्यपंथे।
कुडावा पुढे देव बंदी तयांते|
बळे सोडितां घाव घालीं निशाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी |१२३|

तये द्रौपदीकारणे लागवेगे।
त्वरे धांवतो सर्व सांडूनि मागें|
कळीलागिं जाला असे बौद्ध मौनी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |१२४|

अनाथां दिनांकारणे जन्मताहे।
कलंकी पुढे देव होणार आहे|
तया वर्णिता शीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी |१२५|

जनांकारणे देव लीलावतारी।
बहुतांपरी आदरें वेषधारी|
तया नेणती ते जन पापरूपी।
दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी |१२६|

जगीं धन्य तो रामसूखें निवाला।
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला|
देहेभावना रामबोधे उडाली।
मनोवासना रामरूपीं बुडाली |१२७|

मना वासना वासुदेवीं वसों दे।
मना कामना कामसंगी नसो दे|
मना कल्पना वाउगी ते न कीजे।
मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे |१२८|

गतीकारणे संगती सज्जनाची।
मती पालटे सूमती दुर्जनाची|
रतीनायिकेचा पती नष्ट आहे।
म्हणोनी मनाऽतीत होवोनि राहे |१२९|

मना अल्प संकल्प तोही नसावा।
सदा सत्यसंकल्प चित्तीं वसावा|
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा।
रमाकांत एकान्तकाळी भजावा |१३०|

भजाया जनीं पाहतां राम एकू।
करी बाण एकू मुखी शब्द एकू|
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू।
धरा जानकीनायकाचा विवेकू |१३१|

विचारूनि बोले विवंचूनि चाले।
तयाचेनि संतप्त तेही निवाले|
बरें शोधल्यावीण बोलो नको हो।
जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो|१३२|

हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी।
जेणे मानसी स्थापिलें निश्चयासी|
तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे।
तया भाषणें नष्ट संदेह मोडे |१३३|

नसे गर्व आंगी सदा वीतरागी।
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी|
नसे लोभ ना क्षोम ना दैन्यवाणा।
इहीं लक्षणी जाणिजे योगिराणा |१३४|

धरीं रे मना संगती सज्जनाची।
जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची|
बळे भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे।
महाक्रुर तो काळ विक्राळ भंगे |१३५|

भयें व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे।
भयातीत तें संत आनंत पाहे|
जया पाहतां द्वैत कांही दिसेना।
भयो मानसीं सर्वथाही असेना |१३६|

जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले|
देहेबुद्धिचें कर्म खोटें टळेना।
जुने ठेवणें मीपणें आकळेना |१३७|

भ्रमे नाढळे वित्त तें गुप्त जाले।
जिवा जन्मदारिद्र्य ठाकुनि आले|
देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना |१३८|

पुढें पाहता सर्वही कोंदलेसें।
अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे|
अभावे कदा पुण्य गांठी पडेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना |१३९|

जयाचे तया चूकले प्राप्त नाहीं।
गुणे गोविले जाहले दुःख देहीं |
गुणावेगळी वृत्ति तेहि वळेना।
जुने ठेवणे मीपणे आकळेना |१४०|

म्हणे दास सायास त्याचे करावे।
जनीं जाणता पाय त्याचे धरावे|
गुरू अंजनेवीण तें आकळेना।
जुने ठेवणे मीपणे ते कळेना |१४१|

कळेना कळेना कळेना कळेना।
ढळे नाढळे संशयोही ढळेना|
गळेना गळेना अहंता गळेना।
बळें आकळेना मिळेना मिळेना |१४२|

अविद्यागुणे मानवा उमजेना।
भ्रमे चुकले हीत ते आकळेना|
परीक्षेविणे बांधले दृढ नाणें।
परी सत्य मिथ्या असें कोण जाणें |१४३|

जगी पाहतां साच ते काय आहे।
अती आदरे सत्य शोधुन पाहे|
पुढे पाहतां पाहतां देव जोडे।
भ्रम भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे |१४४|

सदा वीषयो चिंतितां जीव जाला।
अहंभाव अज्ञान जन्मास आला|
विवेके सदा स्वस्वरुपी भरावे।
जिवा ऊगमी जन्म नाही स्वभावें |१४५|

दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी।
अकस्मात आकारले काळ मोडी|
पुढे सर्व जाईल कांही न राहे।
मना संत आनंत शोधुनि पाहे |१४६|

फुटेना तुटेना चळेना ढळेना।
सदा संचले मीपणे ते कळेना|
तया एकरूपासि दूजे न साहे।
मना संत आनंत शोधुनि पाहें |१४७|

निराकार आधार ब्रह्मादिकांचा।
जया सांगतां शीणली वेदवाचा|
विवेके तदाकार होऊनि राहें।
मना संत आनंत शोधुनि पाहे |१४८|

जगी पाहतां चर्मलक्षी न लक्षे।
जगी पाहता ज्ञानचक्षी निरक्षे|
जनीं पाहता पाहणे जात आहे।
मना संत आनंत शोधुनि पाहे|१४९|

नसे पीत ना श्वेत ना श्याम कांही।
नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं|
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे।
मना संत आनंत शोधुनि पाहे |१५०|

खरें शोधितां शोधितां शोधिताहे।
मना बोधिता बोधिता बोधिताहे|
परी सर्वही सज्जनाचेनि योगे।
बरा निश्चयो पाविजे सानुरागे |१५१|

बहूतांपरी कूसरी तत्त्वझाडा।
परी अंतरी पाहिजे तो निवाडा|
मना सार साचार ते वेगळे रे।
समस्तांमधे एक ते आगळे रे |१५२|

नव्हे पिंडज्ञाने नव्हे तत्त्वज्ञाने ।
समाधान कांही नव्हे तानमाने|
नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें।
समाधान ते सज्जनाचेनि योगे |१५३|

महावाक्य तत्त्वादिके पंचकर्णे।
खुणे पाविजे संतसंगे विवर्णे|
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो।
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो |१५४|

दिसेना जनी तेचि शोधुनि पाहे।
बरे पाहता गूज तेथेचि आहे|
करी घेउ जाता कदा आढळेना।
जनी सर्व कोंदाटले ते कळेना |१५५|

म्हणे जाणता तो जनी मूर्ख पाहे।
अतर्कासि तर्की असा कोण आहे|
जनीं मीपणे पाहता पाहवेना।
तया लक्षितां वेगळे राहवेना |१५६|

बहू शास्त्र धुंडाळता वाड आहे।
जया निश्चयो येक तोही न साहे|
मती भांडती शास्त्रबोधे विरोधें।
गती खुंटती ज्ञानबोधे प्रबोधे |१५७|

श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रे।
स्मृती वेद वेदान्तवाक्ये विचित्रे|
स्वये शेष मौनावला स्थीर पाहे।
मना सर्व जाणीव सांडून राहे |१५८|

जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची।
तया भोजनाची रुची प्राप्त कैची|
अहंभाव ज्या मानसीचा विरेना।
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना |१५९|

नको रे मना वाद हा खेदकारी।
नको रे मना भेद नानाविकारी|
नको रे मना शीकवूं पूढिलांसी।
अहंभाव जो राहिला तूजपासी |१६०|

अहंतागुणे सर्वही दुःख होते।
मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते|
सुखी राहता सर्वही सूख आहे।
अहंता तुझी तुंचि शोधुन पाहे |१६१|

अहंतागुणे नीति सांडी विवेकी।
अनीतीबळे श्लाघ्यता सर्व लोकी|
परी अंतरी अर्वही साक्ष येते।
प्रमाणांतरे बुद्धि सांडूनि जाते |१६२|

देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला।
देहातीत ते हीत सांडीत गेला|
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी।
सदा संगती सज्जनाची धरावी |१६३|

मनें कल्पिला वीषयो सोडवावा।
मनें देव निर्गूण तो ओळखावा|
मनें कल्पिता कल्पना ते सरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी |१६४|

देहादीक प्रपंच हा चिंतियेला।
परी अंतरी लोभ निश्चित ठेला|
हरीचिंतने मुक्तिकांता करावी।
सदा संगती सज्जनांची धरावी |१६५|

अहंकार विस्तारला या देहाचा।
स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा|
बळे भ्रांति हें जन्मचिंता हरावी।
सदा संगती सज्जनांची धरावी |१६६|

बरा निश्चयो शाश्वताचा करावा।
म्हणे दास संदेह तो वीसरावा|
घडीने घडी सार्थकाची धरावी।
सदा संगती सज्जनांची धरावी |१६७|

करी वृत्ती जो संत तो संत जाणा।
दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा|
उपाधी देहेबुद्धीते वाढवीते।
परी सज्जना केविं बाधु शके ते |१६८|

नसे अंत आनंत संता पुसावा।
अहंकारविस्तार हा नीरसावा|
गुणेवीण निर्गुण तो आठवावा।
देहेबुद्धिचा आठवु नाठवावा |१६९|

देहेबुद्धि हे ज्ञानबोधे त्यजावी।
विवेके तये वस्तुची भेटी घ्यावी|
तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे।
म्हणोनी सदा तेचि शोधीत जावे |१७०|

असे सार साचार तें चोरलेसे।
इहीं लोचनी पाहता दृश्य भासे|
निराभास निर्गुण तें आकळेना।
अहंतागुणे कल्पिताही कळेना |१७१|

स्फुरे वीषयी कल्पना ते अविद्या।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या|
मुळीं कल्पना दो रुपें तेचि जाली।
विवेके तरी स्वस्वरुपी मिळाली |१७२|

स्वरुपी उदेला अहंकार राहो।
तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो|
दिशा पाहतां ते निशा वाढताहे।
विवेके विचारे विवंचुनि पाहे |१७३|

जया चक्षुने लक्षिता लक्षवेना।
भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना|
क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो।
दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो |१७४|

विधी निर्मिती लीहितो सर्व भाळी।
परी लीहिता कोण त्याचे कपाळी|
हरू जाळितो लोक संहारकाळी।
परी शेवटी शंकरा कोण जाळी |१७५|

जगी द्वादशादित्य हे रुद्र अक्रा।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा|
जगी देव धुंडाळिता आढळेना।
जगी मुख्य तो कोण कैसा कळेना |१७६|

तुटेना फुटेना कदा देवराणा।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा|
कळेना कळेना कदा लोचनासी।
वसेना दिसेना जगी मीपणासी |१७७|

जया मानला देव तो पुजिताहे।
परी देव शोधुनि कोणी न पाहे|
जगी पाहता देव कोट्यानुकोटी।
जया मानली भक्ति जे तेचि मोठी |१७८|

तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले।
तया देवरायासि कोणी न बोले|
जगीं थोरला देव तो चोरलासे।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे |१७९|

गुरु पाहता पाहता लक्ष कोटी।
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी|
मनी कामना चेटके धातमाता।
जनी व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता |१८०|

नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदु।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू|
नव्हे उन्मतू वेसनी संगबाधू।
जनी ज्ञानिया तोचि साधु अगाधू |१८१|

नव्हे वाउगी चाहुटी काम पोटी।
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी|
मुखे बोलिल्यासारिखे चालताहे।
मना सद्गुरु तोचि शोधुनि पाहे |१८२|

जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी।
कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी|
प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे।
तयाचेनि योगे समाधान बाणे |१८३|

नव्हे तोचि जाले नसे तेचि आले।
कळो लागले सज्जनाचेनि बोले|
अनिर्वाच्य ते वाच्य वाचे वदावे।
मना संत आनंत शोधीत जावे |१८४|

लपावे अति आदरे रामरुपी।
भयातीत निश्चीत ये स्वस्वरुपी|
कदा तो जनी पाहतांही दिसेना।
सदा ऐक्य तो भिन्नभावे वसेना |१८५|

सदा सर्वदा राम सन्नीध आहे।
मना सज्जना सत्य शोधुन पाहे|
अखंडीत भेटी रघूराजयोगू।
मना सांडीं रे मीपणाचा वियोगू |१८६|

भुते पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे।
परी सर्वही स्वस्वरुपी न साहे|
मना भासले सर्व काही पहावे।
परी संग सोडुनि सुखी रहावे |१८७|

देहेभान हे ज्ञानशस्त्रे खुडावे।
विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे|
विरक्तीबळे निंद्य सर्वै त्यजावे।
परी संग सोडुनि सुखी रहावे |१८८|

मही निर्मिली देव तो ओळखावा।
जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा|
तया निर्गुणालागी गूणी पहावे।
परी संग सोडुनि सुखे रहावे |१८९|

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता।
पुरेहून पर्ता न लिंपे विवर्ता|
तया निर्विकल्पासि कल्पित जावे।
परि संग सोडुनि सुखे रहावे |१९०|

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना।
तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना|
परब्रह्म तें मीपणे आकळेना।
मनी शून्य अज्ञान हे मावळेना |१९१|

मना ना कळे ना ढळे रुप ज्याचे।
दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचे|
तया खुण ते हीन दृष्टांत पाहे।
तेथे संग निःसंग दोन्ही न साहे |१९२|

नव्हे जाणता नेणता देवराणा।
न ये वर्णिता वेदशास्त्रा पुराणा|
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।
श्रुती नेणती नेणती अंत त्याचा |१९३|

वसे हृदयी देव तो कोण कैसा।
पुसे आदरे साधकू प्रश्न ऐसा|
देहे टाकिता देव कोठे पहातो ।
परि मागुता ठाव कोठे रहातो |१९४|

बसे हृदयी देव तो जाण ऐसा।
नभाचेपरी व्यापकू जाण तैसा|
सदा संचला येत ना जात कांही।
तयावीण कोठे रिता ठाव नाही |१९५|

नभी वावरे जा अणुरेणु काही।
रिता ठाव या राघवेवीण नाही|
तया पाहता पाहता तोचि जाले।
तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले |१९६|

नभासारिखे रुप या राघवाचे।
मनी चिंतिता मूळ तुटे भवाचे|
तया पाहता देहबुद्धी उरेना।
सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना |१९७|

नभे व्यापिले सर्व सृष्टीस आहे।
रघूनायका ऊपमा ते न साहे|
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे।
तया व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे |१९८|

अती जीर्ण विस्तीर्ण ते रुप आहे।
तेथे तर्कसंपर्क तोही न साहे|
अती गुढ ते दृश्य तत्काळ सोपे।
दुजेवीण जे खुण स्वामिप्रतापे |१९९|

कळे आकळे रुप ते ज्ञान होता।
तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था|
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।
तो रे तोचि तो राम सर्वत्र पाहे|२००|

कदा ओळखीमाजि दूजे दिसेना।
मनी मानसी द्वैत काही वसेना|
बहूता दिसा आपली भेट जाली।
विदेहीपणे सर्व काया निवाली |२०१|

मना गुज रे तूज हे प्राप्त झाले।
परी अंतरी पाहिजे यत्न केले|
सदा श्रवणे पाविजे निश्चयासी।
धरी सज्जनसंगती धन्य होसी |२०२|

मना सर्वही संग सोडूनि द्यावा।
अती आदरे सज्जनाचा धरावा|
जयाचेनि संगे महादुःख भंगे।
जनी साधनेवीण सन्मार्ग लागे |२०३|

मना संग हा सर्वसंगास तोडी।
मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी|
मना संग हा साधना शीघ्र सोडी।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी |२०४|

मनाची शते ऐकता दोष जाती। मतीमंद ते साधना योग्य होती|
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी। म्हणे दास विश्वासत मुक्ति भोगी |२०५|
| जय जय रघुवीर समर्थ |